सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
RNI No. - MAHMAR 2023/84526
https://epaper.vidarbhaprajasattak.com
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२३० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १० ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

रतन टाटा अनंतात विलीन

वरळीच्या स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१० मुंबई

टाटा सन्सचे अध्यक्ष रतन नवल टाटा यांचे वयाच्या ८६ व्या वर्षी निधन झाले. बुधवारी रात्री अकराच्या सुमारास त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागात (आयसीयू) दाखल करण्यात आले होते आणि त्यांना वयोमानानुसारचे आजार होते.

टाटा यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी नरिमन पॉइंट येथील नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स येथे ठेवण्यात आले होते. येथून त्यांची शेवटची यात्रा वरळीतील स्मशानभूमीत पोहोचली. या ठिकाणी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अंत्यसंस्कारासाठी उपस्थित आहेत. तर देशभरातील विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसह विविध क्षेत्रातील दिग्गजांनी हजेरी लावली आहे. तर शासकीय इतमामात मोजक्याच व्यक्तींच्या उपस्थितीत रतन टाटा यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, मुकेश अंबानी आणि कुमार मंगलम बिर्ला यांच्यासह राजकारण, क्रीडा आणि व्यवसायातील अनेक व्यक्तींनी टाटा यांना श्रद्धांजली वाहिली. अमिताभ बच्चन यांनी लिहिले की, एक युग संपले आहे.

राज्य सरकारच्या वतीने देण्यात येणाऱ्या उद्योगरत्न पुरस्काराला आता रतन टाटा यांचे नाव देण्यात येणार आहे. त्यामुळे आता उद्योगरत्न रतन टाटा पुरस्कार असे या पुरस्काराचे नाव असेल. व्यवसाय, उद्योग, शिक्षण, रिअल इस्टेट, पर्यटन, वित्तीय सेवा, फॅशन, इलेक्ट्रॉनिक्स, कृषी, बँकिंग या क्षेत्रांच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना महाराष्ट्र सरकारच्या वतीने हा पुरस्कार देण्याचा निर्णय गेल्या वर्षीच घेण्यात आला होता. त्यानंतर पहिलाच पुरस्कार रतन टाटा यांना प्रदान करण्यात आला होता. या पुरस्कारालाच त्यांचे नाव देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे.

मुंबई येथे जे उद्योग भवन बनत आहे, त्यालाही रतन टाटा यांचे नाव देण्यात येणार आहे. नवीन उद्योग भवन हे ७०० कोटी रुपयांच्या खर्चातून उभे राहत आहे. याला नाव देऊन एक प्रकारे शासकीय श्रद्धांजली वाहण्यात आली असल्याची माहिती मंत्री उदय सामंत यांनी दिली.

उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा पहिला 'उद्योगरत्न' पुरस्कार ज्येष्ठ उद्योजक, पद्मविभूषण रतन टाटा यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला होता. सन्मानचिन्ह, मानपत्र आणि २५ लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. टाटा यांच्या निवासस्थानी आयोजित कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर आदी मान्यवर उपस्थित होते. राज्य सरकारच्या वतीने हा पहिलाच पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला होता.

टाटा समूहाचे प्रमुख रतन टाटा यांना महाराष्ट्र सरकारचा पहिला 'उद्योगरत्न' पुरस्कार देण्याचा निर्णय सरकारने गेल्या वर्षीच घेतला होता. हा पुरस्कार सरकारच्या वतीने टाटा यांना देण्यात आला. हा पुरस्कार प्रथमच दिला गेला होता. व्यवसाय, उद्योग, शिक्षण, रिअल इस्टेट, पर्यटन, वित्तीय सेवा, फॅशन, इलेक्ट्रॉनिक्स, कृषी, बँकिंग या क्षेत्रांच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांच्या प्रयत्नांना मान्यता देणे हा महाराष्ट्र उद्योग रत्न पुरस्काराचा उद्देश असल्याचे राज्य सरकारच्या वतीने स्पष्ट करण्यात आले होते.

पद्मविभूषण – पद्मभूषण पुरस्कारांनीही सन्मान

रतन टाटा यांच्या कारकिर्दीत त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना २००८ मध्ये पद्मविभूषण आणि २००० मध्ये पद्मभूषण, या भारतातील दोन सर्वोच्च नागरी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. गेल्या वर्षीच रतन टाटा यांना ऑस्ट्रेलियाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

मोदी–राहुल गांधी आणि सुंदर पिचाई यांच्यासह उद्योगपतींनी व्यक्त केला शोक

टाटा चेअरमन चंद्रशेखर: रतन टाटा यांना निरोप देताना आमचे नुकसान झाल्याची भावना आहे. टाटा हे समूहाचे अध्यक्ष होते. माझ्यासाठी ते गुरू, मार्गदर्शक आणि मित्र होते.

राष्ट्रपती मुर्मू: भारताने कॉर्पोरेट वाढ, राष्ट्र उभारणी आणि नैतिकता यांच्यात उत्कृष्टतेचे मिश्रण करणारा एक प्रतीक गमावला आहे. पद्मविभूषण आणि पद्मभूषण पुरस्कार विजेते रतन टाटा यांनी टाटा समूहाचा वारसा पुढे नेला आहे.

पीएम मोदी: टाटा हे एक दूरदर्शी बिझनेस लीडर, एक दयाळू आत्मा आणि एक विलक्षण माणूस होते. त्यांनी भारतातील सर्वात जुन्या आणि प्रतिष्ठित व्यावसायिक घराण्याला स्थिर नेतृत्व प्रदान केले. त्यांचे योगदान बोर्डरूमच्याही पलीकडे होते.

राहुल गांधी : रतन टाटा हे दूरदृष्टीचे होते. व्यवसाय आणि परोपकार या दोन्हींवर त्यांनी अमिट छाप सोडली आहे. त्यांच्या कुटुंबीयांना आणि टाटा समुदायाप्रति माझ्या संवेदना.

मुकेश अंबानी : भारतासाठी हा अत्यंत दुःखाचा दिवस आहे. रतन टाटा याचे जाणे केवळ टाटा समूहाचेच नव्हे तर प्रत्येक भारतीयाचे मोठे नुकसान आहे. वैयक्तिकरीत्या, रतन टाटा यांच्या निधनाने मला खूप दुःख झाले आहे, कारण मी माझा मित्र गमावला आहे.

गौतम अदानी : भारताने एक महान आणि दूरदर्शी माणूस गमावला आहे. टाटांनी आधुनिक भारताचा मार्ग पुन्हा परिभाषित केला. टाटा हे केवळ व्यापारी नेते नव्हते, तर त्यांनी भारताच्या भावनेला करुणेने मूर्त रूप दिले होते.

जिल्हा परिषद अध्यक्षांच्या निवडणुकीस मुदतवाढ, शाळांना २० टक्के वाढीव अनुदान

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१० मुंबई

महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक तोंडावर आली असून पुढील काही दिवसांमध्ये राज्यात आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्यातील महायुती सरकारने निर्णयांचा धडाका लावला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज (१० ऑक्टोबर) मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील विविध प्रश्नांबाबत चर्चा झाली. याच मंत्रिमंडळ बैठकीत राज्य सरकारने मोठे निर्णय घेतले आहेत. दरम्यान, आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज झालेली मंत्रिमंडळाची बैठक महत्वाची समजली जात होती.

राज्य सरकारने आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, उपसभापतींच्या निवडणुकीस मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच शाळांना २० टक्के वाढीव अनुदानाचा टप्पा देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. याबरोबरच शिंपी, गवळी, लाड्शाखीय वाणी–वाणी, लोहार, नाथपंथीय समाजासाठी महामंडळे (इतर मागास बहुजन कल्याण) तयार करण्यात येणार असून पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र महामंडळे करण्याचा निर्णयासह मदरश्यांमधील शिक्षकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

धनगर समाजाच्या आरक्षणासाठी काढलेले शुद्धीपत्रक राज्य सरकारकडून रद्द

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१०मुंबई

धनगर समाजाच्या आरक्षणासाठी काढण्यात आलेले शुद्धीपत्रक रद्द करण्यात आले आहे. महसूल आणि सामान्य प्रशासन विभागाने हे शुद्धीपत्रक काढले होते. मात्र, एका रात्रीत शुद्धीपत्रक रद्द करण्याची वेळ राज्य सरकावर आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. धनगर ऐवजी धनगड असे वाचावे असे सरकारकडून काढण्यात आलेल्या शुद्धीपत्रकात नमुद करण्यात आले आहे. तर, धनगड महाराष्ट्रात नसून यावर धनगर समाजाने आक्षेप घेतला आहे.

धनगड हे आपल्या राज्यातच नाहीत, अशी भूमिका धनगर समाजाने घेतली आहे. त्यामुळे धनगर समाजाने या शुद्धीपत्रकावर जोरदार आक्षेप घेतला होता. धनगड जातीचे सात दाखले संभाजीनगरात काढले गेले होते. ते जात पडताळणी समितीने रद्द केले आहेत. महसूल व सामान्य प्रशासन विभागाने शुद्धीपत्रक काढले होते. चुकीचे शुद्धीपत्रक काढणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी धनगर समाजाने केली आहे.

धनगड जातीचे सहा प्रमाणपत्र रद्द

धनगर समाजाला एसटीमधून आरक्षण मिळविण्यासाठी अनेक वर्षांपासून लढाई सुरू आहे. राज्यामध्ये धनगड अस्तित्वात नाहीत, असा हायकोर्टाने धनगर आरक्षणाबाबत एक निकाल दिला होता. राज्य सरकारने प्रतिज्ञापत्र दिले होते की राज्यामध्ये एकही धनगड नाही. पण दुर्दैवाने संभाजीनगरमधील फुलंब्री तालुक्यातील भाऊसाहेब नामदेव खिल्लारे व त्यांच्या कुटुंबातील सहा जणांनी धनगड जमातीचे प्रमाणपत्र काढले होते. त्यातील सागर कैलास खिल्लारे यांनी जात पडताळणी समितीकडे प्रमाणपत्र सादर केले होते. परंतु पोलीस दक्षता पथकाच्या चौकशीमध्ये जातीसंदर्भात विसंगत माहिती व पुरावे मिळाले होते. त्यामुळे खिल्लारे यांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागविण्यात आला होता. आता छत्रपती संभाजीनगर येथील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीने सुभाष नामदेव खिल्लारे यांच्यासह सहा जणांचे धनगड जातीचे प्रमाणपत्र रद्द केले आहे.

यावर धनगर आरक्षणासाठी लढणारे गोपीचंद पडळकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जात पडताळणी समितीने एकदा दिलेला दाखला रद्द करण्याचा अधिकार जात पडताळणी समितीला नव्हता, तो अधिकार जात पडताळणी समितीला देऊन जे बोगस धनगडांचे दाखले काढले होते ते सहा दाखले रद्द केले आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे मनःपूर्वक आभार मानतो. यामुळे धनगर एसटी आरक्षणाचा मार्ग मोकळा असल्याचा दाव गोपीचंद पडळकर यांनी केला आहे.

रतन टाटांना मरणोत्तर 'भारतरत्न' मिळणार? राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रस्ताव मंजूर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१० मुंबई

ज्येष्ठ उद्योगपती, पद्मविभूषण रतन टाटा यांचे बुधवारी (दि.९) रात्री निधन झाले आहे. त्यांच्यावर आज दुपारी वरळीतील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. रतन टाटा यांच्या निधनानंतर त्यांना भारतरत्न पुरस्कार दिला जावा, अशी मागणी विविध स्तरावरुन होत आहे. आता राज्य मंत्रिमंडळात रतन टाटा यांना भारतरत्न देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. रतन टाटा यांचे कार्यकर्तृत्व लक्षात घेऊन त्यांना भारतरत्न देण्याची केंद्राला विनंती करणारा प्रस्तावही संमत करण्यात आला, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.

ज्येष्ठ उद्योगपती पद्मविभूषण रतन टाटा यांना आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबतचा शोकप्रस्ताव बैठकीत मांडला. यावेळी रतन टाटा यांचे कार्यकर्तृत्व लक्षात घेऊन त्यांना भारतरत्न देण्याची केंद्राला विनंती करणारा प्रस्तावही संमत करण्यात आला. या शोकप्रस्तावात म्हटले आहे की, उद्यमशीलता हादेखील समाज उभारणीचा प्रभावी मार्ग असतो. नवनवीन उद्योगांच्या उभारणीनेच देश प्रगतीपथावर नेता येतो, मात्र त्यासाठी हृदयात निस्सीम देशप्रेम आणि आपल्या समाजाप्रती तितकाच प्रामाणिक कळवळा हवा.

संजय राऊतांविरोधात पोलिसांकडून गुन्हा दाखल; लाडकी बहीणविषयी केलेलं वक्तव्य पडलं महागात

विदर्भ प्रजासत्ताक दि.१० मुंबई

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांच्या अडचणीत पुन्हा एकदा वाढ होण्याची शक्यता आहे. मध्य प्रदेशातील लाडकी बहीण योजनेवर दिशाभूल करणारी टिप्पणी केल्याप्रकरणी शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्याविरोधात मध्यप्रदेश पोलिसांनी बुधवारी एफआयआर नोंदवला. भाजप महिला मोर्चाच्या जिल्हा युनिटच्या अध्यक्षा वंदना जाचक आणि उपाध्यक्षा सुषमा चौहान यांनी दिलेल्या तक्रारीनंतर भोपाळ गुन्हे शाखेने बुधवारी संध्याकाळी गुन्हा दाखल केला. पोलिस उपायुक्त अखिल पटेल यांनी ही माहिती दिली.

पोलिस उपायुक्त अखिल पटेल यांनी दिलेल्या माहितीनुसार, भाजप महिला मोर्चा जिल्हा युनिटच्या अध्यक्षा वंदना जाचक आणि उपाध्यक्षा सुषमा चौहान यांच्या तक्रारीवरून भोपाळ गुन्हे शाखेने बुधवारी संध्याकाळी राऊतविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मध्य प्रदेश सरकारची लाडली बहना योजना ही केवळ राजकीय खेळी असल्याने बंद करण्यात आल्याचा दावा राऊत यांनी केला होता. त्यानंतर भाजप पदाधिकाऱ्यांनी या प्रकरणी पोलिसांत तक्रार केली होती. आता या प्रकरणी संजय राऊत यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

लाडकी बहीण योजना सुपरहिट, विरोधकांची तोंड काळी झालीत, मुख्यमंत्री शिंदेंचा हल्लाबोल

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१०मुंबई

लाडकी बहीण योजना सुपरहिट झाली आहे आणि विरोधकांची तोंड काळी झालीत. अशी टीका मुख्यंमत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहीण योजनेवरून विरोधकांवर केली आहे. माध्यमांशी बोलताना मुख्यंमत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

यावेळी मुख्यंमत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आज आम्ही लाडकी बहीण योजनेतून २ कोटी ३० लाख माझ्या बहिणीच्या खात्यात ऑक्टोबर आणि नोव्हेंबरचा हफ्ता पाठवला आहे. मात्र काही लोक म्हणत होते आचार संहितेपूर्वी ही योजना बंद पडणार आहे पण आमची देण्याची वृत्ती आहे आणि आमचं सरकार लाडक्या बहिणींच्या मागे उभे रहाणारे सरकार आहे. असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

पुढे बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आमचं सरकार लाडक्या बहिणींच्या मागे उभे रहाणारे सरकार आहे म्हणून आम्ही ऑक्टोबर व नोव्हेंबरचे पैसे लाडक्या बहिणींचे खात्यात एका क्लिकवर दिले आणि आमचं सरकार बहिणींच्या खात्यात हप्ते भरणारे सरकार आहे, हफ्ते घेणारे सरकार नाही असा टोला देखील त्यांनी विरोधकांना लावला तसेच विरोधकांची तोंड आता काळी झालीत. आशाताई भोसले यांनी देखील विरोधकांना चांगली चपराक दिली आहे. खोडा घालणारे कुणीही येउद्या ही लाडकी बहीण योजना सुरूच राहील अशी ग्वाही देखील त्यांनी यावेळी दिली.

तसेच ही योजना यशस्वी राबवण्याची सरकारने जबाबदारी घेतली आहे आणि गरिबांच्या मुलांच्या तोंडचा घास हिरावू नका. या योजनेत कुणी खोडा घातला तर येणाऱ्या निवडणुकीत लाडक्या बहिणी तुम्हाला खोडा घातल्या शिवाय राहणार नाहीत असं देखील माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

सणासुदीच्या काळात मोदी सरकारची राज्यांना मोठी भेट

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१० नवी दिल्ली

वर्षातील सर्वात मोठा सण, म्हणजेच दिवळी अगदी काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. या सणासुदीच्या काळात केंद्र सरकारने राज्यांना मोठी भेट दिली आहे. केंद्राने दुर्गापूजा, दिवाळी आणि छठपूर्वीच राज्य सरकारला कर वाटप म्हणून १,७८,१७३ कोटी रुपये जारी केले आहेत. त्यापैकी ८९,०८६ कोटी रुपये सणांच्या पार्श्वभूमीवर आगाऊ म्हणून जारी केले आहेत.

अर्थ मंत्रालयाने प्रेस रिलीजमध्ये सांगितले की, १० ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारने राज्यांना कर वाटप म्हणून १.७८,१७३ कोटी रुपये जारी केले आहेत. साधारणपणे मासिक कर वाटप ८९,०८६.५० कोटी रुपये असते. परंतु सणासुदीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारे भांडवली खर्चाला गती देऊ शकतील आणि विविध योजनांवरील खर्चासाठी राज्यांना कर वितरणाचा आगाऊ हप्ता देण्यात आला आहे.

कोणत्या राज्याला किती कर वाटप?

अर्थ मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, १,७८,१७३ कोटी रुपयांच्या कर महसूलापैकी सर्वात मोठी रक्कम उत्तर प्रदेशला देण्यात आली आहे. उत्तर प्रदेशला ३१,९६२ कोटी रुपये, बिहारला १७,९२१ कोटी रुपये, मध्य प्रदेशाला १३,९८७ कोटी रुपये, पश्चिम बंगालला १३,४०४ कोटी रुपये, महाराष्ट्राला ११,२५५ कोटी रुपये, राजस्थानला १०,७३७ कोटी रुपये देण्यात आले आहेत.याशिवाय तामिळनाडूला ७,२६८ कोटी रुपये, ओडिशाला ८०६८ कोटी रुपये, कर्नाटकला ६४९८ कोटी रुपये, आंध्र प्रदेशला ७२११ कोटी रुपये आणि पंजाबला ३२२० कोटी रुपये, छत्तीसगडला ६०७० कोटी रुपये, झारखंडला ५९८९२ कोटी रुपये, गुजरातला ६१९७ कोटी रुपये, आसामला ५५७३ कोटी रुपये देण्यात आले आहेत.

संपादकीय .....

अभ्यासक्रमांतील बदल तर्कसंगत

भेदाभेदांची बंदिशाळा

शिक्षा झालेला माणूस तुरुंगात कष्टाची कामे करून आणि इतर विविध जातीपातीच्या गुन्हेगारांसमवेत राहून स्वतःमध्ये बदल घडवून आणू शकतो. तुरुंगात गुन्हेगाराचे माणसात परिवर्तन अपेक्षित असते. तेथे श्रीमंत-गरीब, उच्च-नीच असे कोणतेही भेदाभेद असू नयेत, अशी किमान अपेक्षा असते; पण वास्तवात तसे घडतेच, असे नाही. काही राज्यांतील तुरुंगांमध्ये कामांचे तसेच बराकींचे वाटप करताना, कैद्याची जात व ओळख बघितली जाते. स्वच्छतेची कामे उपेक्षितांना आणि स्वयंपाकाची कामे उच्च जातीच्या कैद्यांना दिली जातात. म्हणूनच जातींच्या आधारे होत असलेला तुरुंगातील हा भेदभाव संपुष्टात आणण्याचे आदेश आता सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. याची अंमलबजावणी करण्यासाठी कारागृह नियमावलीत येत्या तीन महिन्यांत बदल करण्यास केंद्र आणि राज्य सरकारांना सांगण्यात आले. 'सराईत गुन्हेगार' जातीच्या आधारे ठरवणे घटनाबाह्य असल्याचे सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले. स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे लोटल्यावरही, भारतात तुरुंगाबाहेर आणि तुरुंगातही जातिभेद, ही परिस्थिती निश्चितच भूषणावह नाही. ती देशातील प्रत्येक नागरिकास शरमेने मान खाली घालायला लावते आणि देशातील दाहक सामाजिक वास्तव दर्शवते. विशेष म्हणजे, महाराष्ट्रासह किमान दहा राज्यांच्या तुरुंग नियमावल्यांमध्ये कामाचे आणि राहण्याच्या जागांचे वाटप जातीच्या आधारे करण्याची पद्धत आहे. शाहू-फुले-आंबेडकर यांचा वारसा सांगणार्या महाराष्ट्रातील तुरुंगांतही जातिभेद पाळले जावेत, हे आणखी धक्कादायक. कारागृहातील प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष भेदभाव संपवणे ही सरकारचीही जबाबदारी असल्याचे हे आदेश देताना कोर्टाने नमूद केले.

तुरुंगामध्ये अमानवी पद्धतीने कामे किंवा वागणूक दिली, तर राज्यांना जबाबदार धरले जाईल, असा कडक इशाराच कोर्टाने दिला. याप्रकारे कैद्यांच्या जातीनुसार त्यांना वागणूक देणे, हे घटनेच्या अनुच्छेद १४ मधील समानतेच्या तत्त्वाचे उल्लंघनच होय. धोकादायक परिस्थितीत गटारांच्या टाक्यांची स्वच्छता करण्यास लावू नये, हेही कोर्टाला सांगावे लागले! काम करताना अशा कैद्याचा बळी गेल्यास, त्याचे कोणालाही कसलेही सोयरसूतक नसते. कोणताही माणूस केवळ साफसफाई किंवा हलकी कामे करण्यासाठीच जन्माला येत नाही. सुप्रीम कोर्टाने याबाबत सरकारचे कान टोचले, हे योग्यच झाले. स्वतंत्र भारतातही ब्रिटिशकालीन कायद्यांचा अप्रत्यक्ष प्रभाव राहणे, हेही तितकेच चुकीचे. गुन्हेगार वा कैदी असला, तरी त्यालाही मानवी प्रतिष्ठा असते. अमानुष वागणूक देणे अथवा व्यक्तीची अप्रतिष्ठा करणे, हे भारतीय लोकशाहीशीच सुसंगत नाही; पण उत्तर प्रदेशच्या २०२२ सालच्या कारागृह नियमावलीत, 'सफाई कामगारवर्गातील गुन्हेगार,' असा थेट उल्लेख आहे; तर पश्चिम बंगालच्या तुरुंग नियमांत 'स्वयंपाक करण्याचे आणि जेवण नेऊन देण्याचे काम हे सुयोग्य जातीच्या कैद्यांकडे सोपवावे,' असे म्हटले आहे. 'मेहतर किंवा हारी जातीतील व्यक्तींकडेच साफसफाईचे काम सोपवावे,' असाही उल्लेख त्यात आहे; तर मध्य प्रदेशच्या कारागृह नियमांमध्ये काही आदिवासी जमातींचा उल्लेख 'गुन्हेगारी जाती' असा करण्यात आला आहे. स्वतंत्र भारतात जाती-जातींत फरक करून, त्यांना वेगवेगळी वागणूक देणे, हे कोणत्याच नैतिकतेत बसत नाही. ही वसाहतवादी मानसिकता समूळ नष्ट केली पाहिजे.

जातीच्या आधारावर केले जाणारे कैद्यांचे विलगीकरण, त्यांच्या हक्कांसंदर्भात होणारे भेदभाव, यावर त्यांनी प्रकाश टाकला. विशेष म्हणजे, ही मालिका प्रसिद्ध झाल्यानंतर राजस्थानच्या हायकोर्टाने याची स्वतःहून दखल घेत, तेथील तुरुंगनियम बदलण्याचे आदेश दिले. त्यानंतर सुकन्या शांता यांनी, सुप्रीम कोर्टात वकिली करणार्या ॲडव्होकेट दिशा वाडेकर यांना या सगळ्याची महिती दिली आणि नंतर कोर्टाने या प्रकरणाची दखल घेऊन, महत्त्वाचे आदेश दिले.

याबाबत सुकन्या शांता यांचे कौतुक सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी रास्तपणे केले आहे. नागरिक जेव्हा समाजवास्तव दाखवून देण्यासाठी संशोधन करतात, लेख लिहितात आणि कोर्टासमोर अशी प्रकरणे घेऊन येतात, त्यानंतरच हे प्रश्न आम्ही सोडवू शकतो. लोकशाहीच्या चौथ्या स्तंभामुळे समाजातील अन्याय, भेदभाव आणि अन्य चुकीच्या गोष्टींना वाचा फुटते, असेही त्यांनी म्हटले आहे.

बलुचिस्तानातून हिंगलाज देवी विदर्भाच्या अमरावतीत आली!

दि.१० विदर्भ प्रजासत्ताक

हिंगलाज देवीचे मूळ स्थान हे पाकिस्तानातील बलुचिस्तान येथे आहे. फार पूर्वी बलुचिस्तानमध्ये हिंगलाज मातेचा मोठा थाट होता. मात्र कालांतराने हिंगलाज देवीला त्या ठिकाणी काळजी वाटायला लागली. आपल्या खऱ्या भक्ताच्या शोधात ती निघाली असताना ब्रह्मदेवा यांच्या सांगण्यावरून ती वऱ्हाडातील अकोली नगरीत आली. अकोली नगरीजवळ सत्य अरण्य या जंगलात हिंगलाज मातेला अमृतगीर महाराज ज्वालामुखी हिंगलाज देवीची तपस्या करीत असल्याचे त्यांना तिथे दिसले. अमृतगीर महाराजांच्या सहकार्याने त्यांनी चिंतामणजी भगत या देवीच्या भक्ताची कठीण परीक्षा घेतली. चिंतामणजी भगत हे अकोली येथे त्यांच्या बहिणीकडे गुरे चारण्याचे काम करीत होते.

अतिशय आजारी असताना चिंतामणजी भगत यांना ज्वालामुखी हिंगलाज मातेने दृष्टांत दिला. या दृष्टांतानुसार त्यांनी अमृतगीर महाराजांच्या सहकार्याने हिंगलाज मातेची पालखी अकोली नगरीतून घनदाट अरण्यात नेली. मातेच्या दृष्टांतानुसार त्यांनी घनदाट जंगलात तीन भव्य परकोट उभारून परकोटाच्या मधात उंबराच्या झाडाखाली मंदिर उभारून या मंदिरात इ.सन १३०३ मध्ये देवीची प्राणप्रतिष्ठा केली. तेव्हापासून मंदिर परिसरात असणाऱ्या परिसराला हिंगलाजपूर असे नाव पडले.

नऊ पिढ्यांपासून देवीची सेवा करण्यात येत आहे. या मंदिरामध्ये या

मंदिराचे संस्थापक चिंतामणजी भगत यांची मूर्ती देखील स्थापन करण्यात आली आहे. त्यांचा जीवन कार्यकाळ १२५० ते १३५७ असल्याचा उल्लेख देखील आहे. चिंतामणजी भगत यांच्यानंतर मंदिराचे सेवाधारी म्हणून १३५८ ते १४५३ दरम्यान फिरकुजी भगत हे ह्या मंदिराचे सेवाधारी होते. यानंतर १६५४ ते १५४४ दरम्यान कृष्णाजी भगत यांनी सेवाधारी म्हणून हे मंदिर सांभाळले. १५४५ ते १६३८ हा नागोजी भगत हे मंदिराचे सेवाधारी होते.१६३९ ते १७३५ दरम्यान सटवाजी भगत यांनी सेवाधारी म्हणून हे मंदिर सांभाळले. १७३६ ते १८३० दरम्यान आकाजी भगत हे मंदिराचे सेवाधारी होते. १८३१ ते १९२० दरम्यान गणोजी भगत यांनी या मंदिराची सेवा केली. १९२१ ते १९९२ पर्यंत परशुरामजी भगत हे या मंदिराचे सेवाधारी होते. आता भगत कुटुंबातील नव्या पिढीतील रामदास भगत यांच्याकडे सेवाधारी म्हणून हिंगलाज देवी संस्थानची जबाबदारी आहे.

हिंगलाज देवीच्या मंदिर परिसरात महादेवाचे तसेच हनुमानाचे मंदिर सुद्धा आहे. या मंदिरात नवरात्र उत्सवात अष्टमीच्या दिवशी या मंदिरात होम पटवल्या जातो. नवरात्र उत्सवासोबतच हनुमान जयंतीचा देखील उत्सव या मंदिरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. विशेष म्हणजे हनुमान जयंतीच्या दुसऱ्या दिवशी मंदिर परिसरात मोठी यात्रा भरते. या यात्रेच्या दिवशी लाकडाचे ११ गाडे ओढण्याची परंपरा आहे. हा गाडे ओढण्याचा सोहळा पाहण्यासाठी हिंगलाजपूर परिसरालगत असणाऱ्या अनेक गावांमधून हजारो लोक येथे उपस्थित असतात. या यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे हनुमान जयंतीच्या दुसऱ्या दिवशी पहाटे ही यात्रा भरते. दुपारी तीन वाजेपर्यंत हा संपूर्ण परिसर शांत झालेला असतो, अशी माहिती देखील रामदास भगत यांनी दिली.

पाकिस्तानातही आहे देवीचे मंदिर

अमरावती जिल्ह्यात नांदगाव खंडेश्वर तालुक्यात असणारी हिंगलाजपूर येथील हिंगलाज देवी ही मूळची बलुचिस्तानमधील असल्याचे म्हटले जाते. विशेष म्हणजे सध्या पाकिस्तानात असणाऱ्या बलुचिस्तान प्रांतात आज देखील हिंगलाज नदीच्या काठावर हिंगलाज मातेचे मंदिर आहे. प्राचीन काळापासून या ठिकाणी असणाऱ्या हिंगलाज मातेच्या दर्शनासाठी पाकिस्तानातील अनेक हिंदू धर्मीय नियमित जातात, अशी माहिती हिंगलाजपूर येथील देवीच्या मंदिरात येणाऱ्या भाविकांनी दिलेली आहे.

तूर पिकातील खोडावरील करपा रोगाचे कसे कराल व्यवस्थापन

दि.१० विदर्भ प्रजासत्ताक

महाराष्ट्रामध्ये तूर हे महत्वाचे कडधान्य पीक आहे. तूर पिकामध्ये मर, फायटोप्थोरा आणि वांझरोग हे महत्वाचे रोग आहे. बदलत्या वातावरणामुळे व एकच एक पीक घेत असल्यामूळे तूर पीक जैविक व अजैविक घटकाला बळी पडत आहे.

अ) कोलेटोट्रायकम करपा हा रोग कोलेटोट्रायकम डिमॅशियम या बुरशीमुळे होतो.

ब) फायटोप्थोरा करपा हा रोग फायटोप्थोरा ड्रेसलेरा या बुरशीमुळे होतो.

लक्षणे- - कोलेटोट्रायकम करपा रोगात खोडावर, फांद्यावर काळ्या करड्या रंगाचे चट्टे आढळतात.

- रोगाची तीव्रता अधिक असल्यास फांद्या व झाडे वाळतात.

- फायटोप्थोरा करपा या रोगामुळे पानावर ओलसर चट्टे तसेच खोडावर तपकिरी चट्टे जमिनीलगत किंवा जमिनीपासून काही इंच

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

अंतरावर आढळतात.

- नंतर हे चट्टे वाढत जाऊन खोडा सभोवती खोलगट भाग तयार होतो व काही वेळा खोडावर गाठी सुध्दा तयार होतात.

- या चट्टयांवर अनुकुल वातावरणात पांढरट गुलाबी रंगाची बुरशी वाढलेली दिसून येते.

- हे चट्टे वाढत जाऊन झाडाच्या

मुख्य बुंध्याला वेढतात त्यामुळे झाड कमकुवत होऊन त्या ठिकाणी चटकन तुटते.

- या खोडाच्या चट्टयांचा उभा छेद घेतल्यास खोडाचा आतील भाग तपकिरी काळा पडल्याचे दिसते.

- बरेचदा खोडावर २ ते ३ मिली मीटर खोल व २ ते ४ सेंटीमीटर लांब भेगा पडलेल्या दिसतात.

प्रसार- सततचा रिमझिम पाऊस पडत राहिल्यास या रोगाचा प्रादुर्भाव झपाट्याने होतो. ८० ते ८५ टक्के वातावरणातील आर्द्रता व २२ ते २५ अंश तापमान या रोगाचा प्रादुर्भाव वाढण्यास कारणीभूत ठरते. पाण्यातून व हवेद्वारे या रोगाच्या बिजाणूंचा प्रसार होतो.

नियंत्रणाचे उपाय

१) पेरणी करताना सरी वरंबा पद्धतीचा अवलंब करावा.

२) पाणी साचणाऱ्या व पाण्याचा निचरा न होणाऱ्या जमिनीत तूरचे पीक घेऊ नये.

३) बियाण्यास पेरणीपूर्वी कार्बोक्झिम ३७.५ + थायरम ३७.५ टक्के डब्लू. एस. या मिश्र बुरशीनाशकाची ४ ग्रॅम त्यानंतर ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशकाची ४ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी.

४) पाऊस जास्त पडल्यास शेतात चर खोदून अतिरीक्त पाणी शेताबाहेर काढावे.

५) रोगग्रस्त शेतात ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावी.

६) रोग दिसताच मेटालाक्झील ४ टक्के + मन्कॉझेब ६४ टक्के डब्लू. पी. बुरशीनाशक २ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून संपूर्ण झाडावर प्रामुख्याने खोडावर व फांद्यावरही फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास ८ ते १० दिवसांनी पुन्हा फवारणी करावी.

सावधान... ब्रेस्ट कॅन्सरचा धोका वाढतोय

विदर्भ प्रजासत्ताक

दि.१० अमरावती - बदलत्या जीवनशैलीमुळे शरीराची होणारी ससेहोलपट लक्षात येत नाही. जंकफूडचे सेवन, वाढता - लठ्ठपणा, व्यसनाधीनता यामुळे दिवसेंदिवस कॅन्सरबाधित रुग्णांची संख्या वाढत आहे. जगात २८.२ टक्के महिलांना दरवर्षी ब्रेस्ट कॅन्सर होतो.

भारतात १ लाख महिलांमधील २६ महिला ब्रेस्ट कॅन्सरने त्रस्त आहेत. ग्रामीण भागात ६६ टक्के व शहरात ८ टक्के महिला ब्रेस्ट कॅन्सरग्रस्त आढळतात. या आजारामुळे १२.७ टक्के रुग्णांचा मृत्यू होत असल्याची माहिती कॅन्सर तज्ज्ञ डॉ. रेश्मा पवार यांनी दिली.

दहा ते पंधरा वर्षांपूर्वी कॅन्सर हा पन्नास किंवा साठीकडे झुकलेल्या नागरिकांमध्ये आढळायचा; पण सध्या हा आजार २५ ते ५० वयोगटातील महिलांमध्ये सर्वाधिक आहे. बदलत्या जीवशैलीबरोबर उशिरा लग्न, मूल न होणे, दीर्घकाळ स्तनपान न देणे, चरबीत वाढ, व्यसनाधीनता, आनुवंशिकता आदी कारणे आहेत.

वेळेत उपचार घेतल्यास ६० टक्के कॅन्सर टाळता येतो. मात्र, अजूनही ४० टक्के कॅन्सरची कारणे सापडलेली नाहीत. त्याबाबत संशोधन सुरू आहे. अहवालानुसार, स्तनाचा कर्करोग महिलांमध्ये १४ टक्के आहे.

परंतु, २० वर्षांपेक्षा कमी वयाच्या तरुणांमध्ये त्याचे प्रमाण खूप जास्त आहे. स्तनातील गाठी सौम्य असतात. ज्या फायब्रोएडेनोमा किंवा सिस्टसारख्या परिस्थितीमुळे होतात. नॅशनल कॅन्सर रेजिस्ट्री प्रोग्रामच्या आकडेवारीनुसार, ३० वर्षांनंतर स्तन कर्करोगाच्या घटनांमध्ये वाढ होत आहे.

आनुवंशिकता, हार्मोनल बदल कारणीभूत जर कौटुंबिक सदस्य विशेषतः आई, बहीण किंवा आजी यांना लहान वयात काही जनुक उत्परिवर्तन, जसे की, बीआरसीए १ आणि बीआरसीए २ वाढलेल्या जोखमीशी संबंधित असल्यास किंवा हार्मोनल इफेक्टस्मुळेही स्तनाच्या कॅन्सरचा धोका वाढू शकतो.

स्तनाग्रातून स्ट्रेचिंग, असामान्य किंवा रक्तस्राव आणि स्तनामध्ये अचानक बदल झाला असेल, तर त्वरित डॉक्टरांशी संपर्क सावाधा. स्तनाची स्व-परीक्षा ओळखून वेळेत तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. ब्रेस्ट कॅन्सर गेल्या दहा वर्षांपासून झापाट्याने वाढत आहे.

डॉ. रेश्मा पवार, कॅन्सर तज्ज्ञ

आठवडी बाजारातील सार्वजनिक जागेवर केले दुमजली बांधकाम

माहुली जहागीर येथील प्रकार

विदर्भ प्रजासत्ताक

दि.१० नांदगाव पेठ नजीकच्या माहुली जहागीर येथील आठवडी बाजारातील सार्वजनिक जागेवर एका इसमाने चक्क दुमजली इमारत बांधून आठवडी बाजाराची हक्काची जागा हडपण्याचा प्रयत्न केलेला आहे. याबाबत ग्रामपंचायतला तक्रार देऊनही कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नसून अखेर स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देऊन हे अतिक्रमित बांधकाम कायमस्वरूपी पाडण्यात यावे अशी मागणी केली आहे.

माहुली जहागीर वॉर्ड क्र.१ मध्ये असलेल्या आठवडी बाजाराच्या मुख्य रस्त्याच्या मध्ये अ.मजीद मेमन यांनी दुमजली पक्के घराचे बांधकाम केलेले आहे. याप्रकरणी मो सलीम रानानी यांनी ग्रामपंचायतकडे पाठपुरावा करून लेखी तक्रार दिली तसेच कार्यवाहीची मागणी केली मात्र

ग्रामपंचायतने कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नाही.

ग्रामपंचायत प्रशासन अतिक्रमण करणाऱ्या अ. मजीद मेमन यांना पाठबळ देत असल्याचा आरोप सलीम रानानी यांनी केला आहे. शिवसेनेचे अल्पसंख्यांक विभागाचे तिवसा तालुकाध्यक्ष मो. जुनेद मो. सलीम रानानी यांनी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लेखी निवेदन सादर करून कार्यवाहीची मागणी केली आहे. सदर बांधकाम अनधिकृत असून याबाबतचे सर्व जागेचे पुरावे उपलब्ध असून तातडीने याप्रकरणी कार्यवाही करावी अन्यथा याविरोधात आपण न्यायालयात दाद मागू असा इशारा रानानी यांनी दिला आहे

डिसेंबर २०२८ पर्यंत तांदळाचा मोफत पुरवठा सुरु राहणार, केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

विदर्भ प्रजासत्ताक

दि.१० नवी दिल्ली - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना आणि इतर कल्याणकारी योजनासह सरकारच्या सर्व योजनांअंतर्गत पोषणमूल्ययुक्त तांदळाचा सार्वत्रिक पुरवठा सध्याच्या स्वरूपात जुलै २०२४ ते डिसेंबर २०२८ पर्यंत सुरू ठेवण्यास मंजुरी दिली आहे.

प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना (अन्न अनुदान) चा भाग म्हणून पोषणमूल्ययुक्त तांदळाचा उपक्रम केंद्र सरकारच्या १०० टक्के अर्थसहाय्यासह केंद्रीय क्षेत्रातील उपक्रम म्हणून सुरू राहील आणि यामुळे अंमलबजावणीसाठी एक एकीकृत संस्थात्मक यंत्रणा उपलब्ध होईल. त्यानुसार, देशातील निमिया आणि सूक्ष्म पोषक घटकांची कमतरता दूर करण्यासाठी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली, इतर कल्याणकारी योजना, एकात्मिक बाल विकास सेवा, पीएम पोषण (पूर्वीचे माध्यान्ह भोजन) च्या माध्यमातून पोषणमूल्ययुक्त तांदळाचा पुरवठा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

एप्रिल २०२२ मध्ये आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीने मार्च २०२४ पर्यंत देशभरात टप्प्याटप्प्याने पोषणतत्वयुक्त तांदळाचा उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला होता. सर्व तीन टप्पे यशस्वीरित्या पूर्ण झाले आहेत आणि सरकारच्या सर्व योजनांमध्ये पोषणमूल्ययुक्त तांदळाचा पुरवठा करण्याच्या सार्वत्रिक व्याप्तीचे लक्ष्य मार्च २०२४ पर्यंत साध्य झाले आहे.

२०१९ ते २०२१ दरम्यान आयोजित राष्ट्रीय कुटुंब आरोग्य

सर्वेक्षण (छ्रक्रड-५) नुसार, निमिया ही भारतातील एक व्यापक समस्या आहे, ज्याचा परिणाम विविध वयोगटातील तसेच उत्पन्नाच्या स्तरांमधील मुले, महिला आणि पुरुष यांच्यावर होतो. लोहाच्या कमतरतेव्यतिरिक्त, व्हिटॅमिन बी १२ आणि फॉलिक ॲसिड सारख्या इतर जीवनसत्त्वे आणि खनिजांची कमतरता देखील असते आणि त्याचा लोकांच्या एकूण आरोग्यावर आणि उत्पादकतेवर परिणाम होतो.

कुपोषणमुक्तीसाठी एक पाऊल - असुरक्षित लोकसंख्येतील ॲनिमिया आणि सूक्ष्म पोषक घटकांचे कुपोषण दूर करण्यासाठी सुरक्षित आणि प्रभावी उपाय म्हणून जागतिक स्तरावर पोषणमूल्ये-युक्त अन्नाचा वापर केला जातो. भारताच्या बाबतीत तांदूळ हे सूक्ष्म पोषणद्रव्यांचा पुरवठा करण्यासाठी एक योग्य धान्य आहे. कारण भारतातील ६५% लोकसंख्येचे तांदूळ हे मुख्य अन्न आहे. पोषणमूल्ययुक्त तांदळामध्ये भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण द्वारे निर्धारित मानकांनुसार नियमित तांदळामध्ये (कस्टम मिल्ड राइस) सूक्ष्म पोषक घटकांनी (लोह, फॉलिक ॲसिड, व्हिटॅमिन बी १२) समृद्ध असलेल्या फोर्टिफाइड राइस

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. १० ऑक्टोबर २०२४ शहर/ग्रामिण

उद्योगसूर्याचा अस्त, रतन टाटा कालवश

ब्रीच कॅण्डी रुग्णालयात घेतला अखेरचा श्वास

उद्योगविश्वासह सर्वत्र हळहळ

विदर्भ प्रजासत्ताक

दि.१० मुंबई – संपूर्ण जगासमोर गुणवत्ता आणि सचोटीचा आदर्श निर्माण करणारे... कोट्यवधी मनांवर आपल्या प्रेरणादायी आचार अन् विचारांचा वस्तुपाठ कोरणारे प्रसिद्ध उद्योगपती तथा टाटा सन्सचे माजी अध्यक्ष रतन टाटा यांचा जीवनप्रवास वयाच्या ८६व्या वर्षी थांबला. सर्वसामान्य कुटुंबीयांचे कारचे स्वप्न पूर्ण करून नॅनोच्या माध्यमातून घराघरात पोहोचलेले टाटा यांच्या जाण्याने उद्योगविश्वातील एक ऋषितुल्य व्यक्तीची न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. आपल्या शालीन आणि सुसंस्कृत स्वभावासाठी ओळखल्या जाणाऱ्या रतन टाटा यांच्या निधनाने उद्योगविश्वासह सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

रतन टाटा यांना सोमवारी पहाटे प्रकृती अस्वास्थ्यामुळे ब्रीच कॅण्डी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरु होते. बुधवारी उपचारादरम्यान त्यांची प्रकृती खालावल्याने त्यांना व्हेंटीलेटवर ठेवण्यात आले होते. रुग्णालयातील डॉक्टरांच्या चमूकडून सर्व शर्तीचे प्रयत्न सुरु होते मात्र रात्री उशिरा त्यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. रात्री उशिरा टाटा सन्स चे चेअरमन एन. चंद्रशेखरन यांनी ही बातमी अधिकृतरित्या जाहीर केली.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्यांना सुरुवातीला रक्तदाबाचा त्रास होता. मात्र त्यानंतर त्यांच्या हृदयाची तपासणी करण्यात आली होती. मात्र त्यामध्ये कोणत्याही विशेष आजराचे निदान झाले नव्हते. मात्र त्यानंतर काही कालावधीने त्यांची प्रकृती ढासळल्याने त्यांना व्हेंटिलेटर ठेवण्यात आले होते. रुग्णलायतील वरिष्ठ डॉक्टरच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरु होते. अखेर बुधवारी रात्री ते उपचाराला कोणताही प्रतिसाद देत नसल्याचे कळल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.बुधवारी रात्री निधन झालं. वयाच्या ८६ व्या वर्षी त्यांनी मुंबईतील रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. रतन टाटा यांच्या व्यक्तिमत्त्वावर नजर टाकली तर ते केवळ उद्योजकच नाही, तर ते उदार व्यक्ती, लोकांसाठी आदर्श आणि प्रेरणास्थान होते.

दोन दशके अध्यक्षपदाची धुरा सांभाळली

जेआरडी टाटा यांच्याकडून जेव्हा रतन टाटा यांनी व्यवसायाची सुत्रे स्वीकारली त्यानंतर विश्वास या शब्दाशी एकरुप झालेला त्यांचा व्यवसाय पुढे तसाच जोपासणे आणि प्रत्येक दशकात भारतात होणाऱ्या नव्या घडामोडींचा वेध घेत त्या अनुषंगाने व्यवसाय विस्तार करण्याचे आव्हान त्यांच्यापुढे होते. एका कुटुंबाचा उद्योग या प्रतिमेतून जागतिक दर्जाचे व्यवसाय साम्राज्य अशी त्यांनी टाटा समुहाची ओळख निर्माण केली. मूल्याधारित व्यवसाय हे सूत्र त्यांनी तंतोतंत जोपासले. संयत व नम्र व्यावसायिक ही त्यांची छबी कायमच जनमानसाच्या मनावर कोरली गेली आहे.

रतन टाटा यांच्या स्मरणार्थ राज्यात एक दिवसाचा दुखावटा

ज्येष्ठ उद्योगपती, पद्मविभूषण रतन टाटा यांच्या निधनानंतर त्यांच्या सन्मानार्थ राज्यात आज (गुरुवार १० रोजी) एक दिवसांचा दुखवटा पाळण्यात येणार आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषणा केली आहे.रतन टाटा यांना सन्मानपूर्वक निरोप देण्यासाठी श्रद्धांजली म्हणून हा शासकीय दुखवटा राहील. या काळात राज्यातील शासकीय कार्यालयांवरील राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविण्यात येतील तसेच मनोरंजन किंवा करमणुकीचे कुठलेही कार्यक्रम होणार नाहीत.रतन टाटा यांच्यावर शासकीय इतमामाने अंत्यसंस्कार करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे उद्घाटन

वैद्यकीय महाविद्यालये आरोग्यसेवेची केंद्र ठरावीत – प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

विदर्भ प्रजासत्ताक

दि.१० अमरावती– प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे आज राज्यात ७ हजार ६४५ कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला. नागपूर व शिर्डी विमानतळाच्या कामांचे भूमिपूजन, स्क्रील सेंटर, तसेच नवीन १० शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यात अमरावती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे उद्घाटन ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार रवी राणा, प्रताप अडसड, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, अपर जिल्हाधिकारी सूरज वाघमारे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. किशोर इंगोले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातुरकर आदी उपस्थित होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले, नव्याने निर्माण होणारे वैद्यकीय महाविद्यालये लाखो परिवारांचे सेवेचे केंद्र ठरणार आहे. या केवळ संस्था ठरणार नसून असंख्य परिवारांचे जीवन घडविण्याचा यज्ञ आहे. नव्या वैद्यकीय महाविद्यालयांमुळे वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या ९०० जागा निर्माण होणार आहेत. त्यामुळे आता राज्यभरात सहा हजार वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या जागा उपलब्ध होतील. यामुळे दुर्गम भागात नव्या संधीची दालने उपलब्ध होतील. आयुष्मान कार्डच्या माध्यमातून लाखो परिवारांना मोफत उपचार, तर जनऔषधी केंद्रातून स्वस्तात औषधे मिळत आहे. कर कमी करून हृदयरोग आणि कॅंसरवरील औषधोपचाराचा खर्च कमी करण्यात आला आहे. या माध्यमातून गरीब कुटुंबांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यात आली आहे.प्रत्येक नागरिकाला माफक दरात उच्च प्रतीची आरोग्य सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी शासन कटिबद्ध आहे. केंद्र व राज्य शासनाने वैद्यकीय महाविद्यालयांकडे विशेष लक्ष देऊन नागरिकांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा मिळाव्यात, तसेच वैद्यकीय अधिकारी निर्माण व्हावेत यादृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. यामुळे राज्यात दहा नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यात येत आहे. वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या इच्छुक पात्र विद्यार्थ्यांना नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या निर्मितीमुळे मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच आता येथे प्रवेशित विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेतून म्हणजेच मराठीतून वैद्यकीय शिक्षण घेता येणार आहे. यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. आता ग्रामीण भागातील विद्यार्थीही वैद्यकीय शिक्षणात अग्रक्रमी राहतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. क्षिप्रा मानकर यांनी सूत्रसंचालन केले.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर २५ ऑक्टोबरला प्राथमिक शिक्षकांना वेतन व सण अग्रीम मिळावा

प्राथमिक शिक्षक समितीची शिक्षणमंत्र्यांकडे मागणी

विदर्भ प्रजासत्ताक

दि.१०अमरावती– दिवाळी पूर्वी वेतन दि. २९ ऑक्टोबर पासून दिवाळी सणोत्सवास सुरुवात होत आहे. ज्यावर्षी दिवाळी सण महिन्याच्या तिसऱ्या/चौथ्या सप्ताहात असतो; त्यावर्षी राज्य शासनाने त्या महिन्याचे वेतनविशेष बाब म्हणून त्याच महिन्यात यापूर्वी केले आहे. या परंपरेस अनुसरून ऑक्टोबर देय नोव्हेंबर-२०२४ महिन्याचे वेतन ऑक्टोबर महिन्यातच मिळण्याची महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने मागणी केली आहे.तसेच ऑक्टोबर महिन्याचे वेतनासाठी आवश्यक वेतन अनुदान / सहाय्यक अनुदान तातडीने उपलब्ध करून द्यावे. सण अग्रीम : जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकांना अन्य शासकीय व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांप्रमाणे सण अग्रीम अनुज्ञेय आहे. २०२२ पर्यंत दरवर्षी सण अग्रीम मिळाले असून त्याचा परतावा दरमहा समान १० हप्त्यात केलेला आहे. मात्र २०२३ मध्ये जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकांना सण अग्रीम देण्यात आला नाही. याबाबत शिक्षणमंत्र्यांनी स्वतः दि. २ नोव्हेंबर २०२९ रोजी स्पष्ट सूचना शालेय शिक्षण विभागाच्या मा. उप सचिवांना बालभारती– मुंबई येथे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती पदाधिकाऱ्यांसह झालेल्या बैठकीत दिल्या होत्या. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकांना अन्य शासकीय व जिल्हा परिषद कर्मचारी आणि शासकीय प्राथमिक शाळांतील शिक्षकांप्रमाणे सण अग्रीम मिळण्यासाठी आदेशित करावे अशीही महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती कडून मागणी करण्यात आलीआहे. तरी प्राथमिक शिक्षकांना दिवाळी पूर्वी चालू महीण्याचे मासिक वेतन व सण अग्रीम मिळण्याची मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर,शिक्षक नेते उदय शिंदे,राज्य सल्लागार विजयकुमार पंडित ,महादेव पाटील माळवदक,राज्य उपाध्यक्षराजन सावंत ,आनंदा कांदळकर,विलास कंटेकुरे,राज्य कार्याध्यक्ष,सयाजी पाटील,राज्य कोषाध्यक्षनंदकुमार होळकर,राज्य संघटक राजेंद्र खेडकर,सुरेश पाटील,राज्य कार्यालयीन चिटणीसकिशोर पाटील,सतिश सांगळे,राज्य संपर्क प्रमुखकिशन बिरादार,राज्य प्रवक्तानितीन नवले,राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर,राज्य ऑडिटर पंडित नागरगोजे,महिला आघाडी प्रमुख वर्षाताई केनवडे, नपा-मनपा आघाडी प्रमुखसुधाकर सावंत,जुनी पेन्शन आघाडी प्रमुख ऋश्रळज्ञिरीं पुंडकर,उर्दू आघाडी प्रमुखसैय्यद शफीक अली यांनी निवेदना व्दारे केली आहे असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुक राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

'पाताल लोकातुन भगवान विष्णूचे स्वर्गात परत येणे देखावा ठरतोय भक्तांसाठी आकर्षण

विदर्भ प्रजासत्ताक

दि.१० अमरावती– श्री वीर प्रताप नवदुर्गोत्सव मंडळ अमरावती नवरात्रोत्सव उत्साहात साजरा होत आहे. दरवर्षी नवरात्रोत्सवात अमरावती शहरासह संपूर्ण जिल्ह्यातून व विदर्भातील विविध शहरातून लाखो भाविक श्री वीर प्रताप नवदुर्गोत्सव मंडळ अमरावती येथे येऊन विविध प्रकारच्या देखाव्यांचा लाभ घेतात. या वर्षी श्री वीर प्रताप नवदुर्गोत्सव मंडळ अमरावती येथे परंपरेनुसार पौराणिक कथेवर आधारित माता लक्ष्मी आणि राजा बळीची घटना, पाताल लोकातुन भगवान विष्णूचे स्वर्गात परत येणे या ह्या कथे वर जीवंत देखावा सादर करण्यात आला आहे. अमरावती शहराच्या सराफा बाजार येथील वीर प्रताप नवदुर्गा महोत्सव मंडळ ५४ वर्षांपासून अखंडपणे पौराणिक कथे चा आधारवार झाकी दाखवत असून, या वर्षी स्त्री शक्तीचा महिमा दाखवत, राजा बळी आणि माता लक्ष्मी यांची पौराणिक कथा, ज्यामध्ये भगवान विष्णूला पाताळातून स्वर्गात परत आणण्याची घटना एक झांकीच्या रूपात मांडण्यात आली आहे. है देखावा बघण्यासाठी भक्तांची प्रचंड गर्दी या ठिकाणी होत आहे.

हिंदू पौराणिक कथेनुसार, सुमारे ३८ लाख ८० हजार वर्षांपूर्वी सत्ययुगात पहिल्यांदा राखी बांधण्यात आली होती. सत्ययुगात, प्रल्हादचा नातू राक्षस राजा बळी होता, जो त्याच्या आजोबांप्रमाणेच भगवान विष्णूचा महान भक्त होता आणि दानशूर मानला जात असे.राजा बळीने राक्षस गुरु शुक्राचार्यांच्या मदतीने १०० यज्ञ पूर्ण केले आणि स्वर्ग जिंकला. स्वर्गात गोंधळ उडाला, भगवान इंद्राने भगवान विष्णूंकडे आश्रय मागितला आणि त्यांना स्वर्गाचे रक्षण करण्याची विनंती केली, त्यानंतर वामन अवतारातील भगवान विष्णू बालीच्या दारात पोहोचले आणि उदार बळीकडे भिक्षा म्हणून तीन पाऊल जमीन मागितली. वचन दिल्यानंतर, भगवान विष्णूच्या वामन अवताराने स्वर्ग आणि पृथ्वीचे दोन चरणांमध्ये मोजमाप केले, राजा बळीला समजले की हा वामन सामान्य माणूस नाही, जेव्हा त्याला तिसरे पाऊल ठेवण्यासाठी जागा मिळाली नाही, तेव्हा बळीला त्याची वचन पूर्तता करण्यासाठी., देवाची तिसरी पाऊल आपल्या डोक्यावर ठेवले .यावर भगवान विष्णू खूप प्रसन्न झाले, त्यांनी बळीला पाताळाचा राजा बनवले. आणि वरदान मागायला सांगितल्यावर, राजा बळीने पाताळात राहून स्वतःच्या सुरक्षेसाठी भगवान विष्णूकडे वरदान मागितले आणि भगवान विष्णू राजा बळीचे द्वारपाल बनले आणि त्याच्या राज भवनात तैनात झाले.दुसरीकडे, स्वर्गात माता लक्ष्मी आपल्या पती भगवान विष्णूची वाट पाहत राहिली, जेव्हा भगवान विष्णू खूप वेळ स्वर्गात परतले नाहीत तेव्हा नारदजींच्या सांगण्यावरून माता लक्ष्मी एका सामान्य स्त्रीचे रूप घेऊन बली च्या महालात पोहोचल्या. राजा बळीचा पाताल लोकात गेले , आणि त्याला सांगितले की तिला भाऊ नाही, तिची अवस्था ऐकून, राजा बळीचे हृदय द्रवले आणि बळीने तिला आपली धार्मिक बहीण बनवले.

हे नाते दृढ करण्यासाठी देवी लक्ष्मीने राजा बलीला धाग्याचे रक्षासूत्र घालायला लावले. मग देवी लक्ष्मी तिच्या वास्तविक रूपात आली आणि तिने बालीला भेट म्हणून आपला पती भगवान विष्णूंना त्याच्या संरक्षणाच्या जबाबदारीतून मुक्त करण्याचे वचन मागितले. यानंतर बळीने आपले वचन पाळत भगवान विष्णूंना आपल्या वरदानातून मुक्त केले आणि माता लक्ष्मीने आपल्या पतीला रक्षासूत्रातून मुक्त केले आणि नारायण स्वर्गात परतले अश्या प्रकारचा देखावा वीर प्रताप नवदुर्गा महोत्सव मंडळाने साकारला आहे.

माता लक्ष्मी आणि राजा बळीची घटना

राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांना हृद्य निरोप

आयोगाची प्रतिष्ठा कायम राहण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने कामे करावीत - राहुल पांडे

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१०अमरावती,

आयोगाची प्रतिष्ठा कायम राहण्यासाठी कार्यालयातील प्रत्येकाने सोपविलेली कामे जबाबदारीने व जाणीवपूर्वक कालमर्यादेत पूर्ण करण्याचे प्रयत्न करावे, असे राज्य माहिती आयुक्त (से.नि.) राहुल पांडे यांनी सांगितले. राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ अमरावतीचे राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांचा कार्यकाळ संपल्यामुळे त्यांना कार्यालयाच्यावतीने आज हृद्य निरोप देण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.याप्रसंगी, निरोप समारंभा निमित्त श्री. राहुल पांडे यांचा कार्यालयाच्यावतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देवून सत्कार करण्यात आला. उपसचिव देविसिंग डाबेराव, माहितीचा अधिकार अधिनियमाचे व्याख्येते ड. राजेंद्र पांडे यांच्यासह कार्यालयातील अन्य कर्मचारी उपस्थित होते.सत्काराला उत्तर देताना श्री. पांडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, अमरावती खंडपीठाचा कार्यभार घेतेसमयी याठिकाणी पायाभूत सुविधा तसेच संगणक अद्ययावतीकरणाची कमतरता होती. त्या दूर सारण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आले. आयोगाकडे सादर होणाऱ्या प्रकरणांचा तात्काळ निपटारा होण्याच्या दृष्टीने कार्यालयात अद्ययावत सुविधायुक्त ऑनलाईन सुनावणी कक्ष (व्हिडीओ कॉन्फरन्सींग) व अभिलेखागार निर्माण करुन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमुर्ति भुषण गवई यांच्या हस्ते दोन्ही सुविधांचे उद्घाटन करण्यात आले. आयोगाकडे सादर होणाऱ्या ऑनलाईन व ऑफलाईन सुनावन्या जलदगतीने घेवून जवळपास २६ हजार प्रकरणांचा निपटारा अमरावती खंडपीठाव्दारे करण्यात आला आहे. आयोगातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आयोगाकडे सादर होणाऱ्या अपील व तक्रार प्रकरणांचा जलदगतीने निपटारा होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, असे आवाहन श्री. पांडे यांनी यावेळी केले.

नागपूर, अमरावती व छत्रपती संभाजीनगर येथील आयोगाचा जवळपास ७६ महिन्यांचा राज्य माहिती आयुक्त म्हणून त्यांनी कार्यभार सांभाळला आहे. आयोगाकडे सेवा देणारे कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन नियमितपणे देता येईल, यासाठी प्रयत्न व्हावेत, असे राहुल पांडे यांनी यावेळी सांगितले.

राज्य माहिती आयुक्त पदाचा श्री. पांडे यांनी कार्यभार घेतल्यावर अमरावती खंडपीठात प्रलंबित प्रकरणांचा निपटारा जलदगतीने होण्यास सहाय्यता झाली. श्री. पांडे यांच्याकडे अमरावती खंडपीठाच्या राज्य माहिती आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार असताना सुध्दा त्यांच्या संपूर्ण सेवाकाळात जवळपास २६ हजार व्दितीय अपील व तक्रार प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत, अशी माहिती श्री. डाबेराव यांनी प्रास्ताविकातून दिली.

याप्रसंगी माहितीचा अधिकार अधिनियमाचे व्याख्येते ड. राजेंद्र पांडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वैशाली गहुकर केले तर प्रियंका राऊत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

समाजात रक्तदानासह अवयवदान करण्यासंदर्भात जनजागृती करावी

कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांचे प्रतिपादन

विद्यापीठात रक्तदान शिबिर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१० अमरावती- रक्तदान सर्वश्रेष्ठ दान असून, रक्तदानासह अवयवदानाची जनजागृती सर्वसामान्यांमध्ये व्हावी, विद्यापीठाचे विद्यार्थी हे जनजागृतीकरिता पुढाकार घेतील, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभाग व आरोग्य विभागाच्या संयुक्त सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. हे शिबिर प्राणीशास्त्र विभागाच्या सभागृहात झाले. त्या प्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या प्रसंगी डॉ. दिलीप सौंदळे, डॉ. प्रसाद वाडेगावकर, डॉ. एच. बी. नांदुरकर, डॉ. स्मिता थोरात व रक्तदान केंद्राचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलींद तायडे उपस्थित होते. कुलगुरू पुढे म्हणाले, समाजाचे आपण देणे लागतो, ही भावना सर्वांमध्ये निर्माण झाली पाहिजे. त्याकरिता जनजागृती व्हायला हवी. रक्तदानाचे अनेक फायदे आहेत. महत्त्वाचे म्हणजे गरजूंचे प्राण त्यामुळे वाचू शकतात. आपल्या दानातून गरजूला जेव्हा फायदा होतो, त्या वेळेला प्रत्येकाला

आनंद झालेला असतो. दर चार महिन्यानंतर प्रत्येकाने रक्तदान करावे, असे आवाहन त्यांनी या प्रसंगी केले. रक्तदानाबरोबरच अवयवदानाचे महत्त्व व श्रेष्ठत्व तेवढेच आहे. रक्तदानासह अवयवदानाचे महत्त्व सर्वांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांनी स्वीकारावी, असे आवाहनही त्यांनी या प्रसंगी विद्यार्थ्यांना केले. डॉ. दिलीप सौंदळे म्हणाले, अमरावतीत शासकीय रक्तपेढीसह तीन खासगी रक्तपेढ्या आहेत. मेळघाटमध्ये रक्तपेढी सुरू होणार आहे. सिकलसेल, ॲनेमिया, पॅलेसिनिया या रुग्णांना रक्ताची अधिक गरज भासते. रिप्लेसमेंट दाता मिळत नसल्यामुळे रक्तदान शिबिराच्या माध्यमातून पेढीत रक्त जमा केले जाते. गरजूंना रक्त उपलब्ध व्हावे, याकरिता सर्वांनी शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन करताना ते पुढे म्हणाले, वाढदिवस, लग्न वाढदिवसाला रक्तदान करू शकता. प्रयोगशाळेत रक्त तयार होत नसल्यामुळे दात्यांनी रक्तदान करणे आवश्यक आहे. ही संधी प्रत्येकाने घ्यावी, असे ते म्हणाले.

याप्रसंगी मिलींद तायडे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रथम फित कापून कुलगुरुंच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन केले . दीपप्रज्वलन, महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात केली. सूत्रसंचालन रसिका काळे, तर आभार डॉ. विनय नागले यांनी मानले. कार्यक्रमाला राजेश पिदडी उपस्थित होते.२९ दात्यांनी केले रक्तदान या रक्तदान शिबिरात माजी प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर, डॉ. संदीप वाघुळे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, डॉ. प्रशांत शिंग्वेकर, डॉ. विनय नागले, विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, विविध विभागातील विद्यार्थ्यांसह एकूण २९ जणांनी शिबिरात रक्तदान केले.

धामणगाव रेल्वे मतदारसंघ

महाविकास आघाडीत रस्सीखेच तर महायुतीत प्रताप अडसडच शिलेदार ?

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१० चांदुर रेल्वे-

अवघ्या महिन्याभरावर येऊन ठेपलेल्या विधानसभा निवडणुकीचा ज्वर दिवसेंदिवस तापत असून, जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे विधानसभेसाठी प्रचंड रस्सीखेच सुरू आहे. महाविकास आघाडीत काँग्रेसचे वीरेंद्र जगताप, उबाठाचे अभिजीत ढेपे यांच्या टिकीटासाठी घमासान सुरू असून, महायुतीकडून मात्र भाजपचे विद्यमान आमदार प्रताप अडसड हे एकमेव शिलेदार असल्याचे दिसून येत आहे.

मागील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे वीरेंद्र जगताप यांचा भाजपच्या प्रताप अडसड यांचे विरोधात १० हजार मताचे फरकाने पराभव झाला होता आणि मागील तीन पंचवार्षिकमध्ये झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष व काँग्रेस यांच्यातच प्रमुख लढती झाल्या. त्यामुळे २०२४ च्या निवडणुकीसाठी वीरेंद्र जगताप यांनी चांगलीच कंबर कसली परंतु जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष अभिजीत ढेपे यांनी उबाठामध्ये पक्षप्रवेश करून धामणगाव रेल्वे विधानसभेसाठी दावा ठोकल्याने वीरेंद्र जगताप यांच्या समोर चिंतेचे सावट उभे झाले आहे.

उबाठाच्या राज्यातील वरिष्ठ नेत्यांनीसुद्धा धामणगाव रेल्वे विधानसभेमध्ये कुठल्याही परिस्थितीत उबाठासाठीच खेचून आणायचा असा चंग बांधलेला दिसून येत आहे. धामणगाव विधानसभेसाठी कुठलीही तडजोड होणार नाही असा निर्धार केल्याने महाविकास आघाडीतील काँग्रेस व उबाठामध्ये टिकीटासाठी चांगलीच रस्सीखेच सुरू असाल्याचे दिसून येत आहे तर दुसरीकडे मात्र महायुतीमध्ये भाजपचे आमदार प्रताप अडसड यांनी केलेल्या कोट्यवधीचे विकास कामे व त्यांचा मनमिळाऊ स्वभाव यामुळे भाजपातील घटक पक्ष व भाजपा कार्यकर्त्यांमध्ये एकच वादा प्रतापदादा या नावावर शिक्कामोर्तब झाल्याचे दिसून येत आहे.अभिजीत ढेपे यांच्या उबाठा प्रवेशामुळे शिवसेनेचे प्राबल्य वाढत असून, सहकारक्षेत्रात त्यांची असलेली पकड व मतदार संघात असलेला दांडगा संपर्क, यामुळे शिवसेनेला गतवैभव प्राप्त करण्यासाठी ही एक संधी असल्याची उबाटा गटामध्ये चर्चा आहे. त्यामुळे ही निवडणूक रंगतदार होणार असून, टिकीटासाठी होत असलेल्या धावपळीमुळे महाविकास आघाडीत बिघाडी होण्याची शक्यता नाकारता येणार नाही, अशा परिस्थितीमध्ये झुकते माप कोणाला मिळणार याची उत्सुकता लागली आहे.

अकोल्यातील हरिहर पेठ भागात पुन्हा वाद; दोन दिवसांत दुसऱ्यांदा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१०अकोला :- जुने शहर येथील हरिहरपेठ भागात पुन्हा एकदा क्षुल्लक कारणावरून वाद निर्माण झाल्याची घटना बुधवारी सायंकाळी घडली. यात एक जण किरकोळ जखमी झाला. यावेळी विशिष्ट समुदाय मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरला होता. जुने शहर पोलिसांसह दंगल नियंत्रण पथकाने घटनास्थळ गाठून तात्काळ परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. याच भागात सोमवारी दोन गटात मोठा वाद होऊन दगडफेक व जाळपोळ झाली होती.

अत्यंत संवेदनशील भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जुने शहराच्या हरिहर पेठ भागात आज सायंकाळी पुन्हा एकदा वाद निर्माण झाला. अतिशय क्षुल्लक कारणावरून हा वाद झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यामध्ये एक जण किरकोळ जखमी झाला. या वादानंतर एका विशिष्ट समुदायाचे नागरिक रस्त्यावर उतरले होते. या घटनेची माहिती मिळताच जुने शहर पोलीस व दंगल नियंत्रण पथकाने घटनास्थळावर धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. परिसरात सध्या शांतता आहे.या भागात सोमवारी ऑटो रिक्षाचा एका दुचाकीला धक्का लागल्यावरून मोठ्या वादात पर्यवसान झाले होते. या वादावरून गाडगे नगर व हमजा प्लॉट येथील दोन वेगवेगळ्या समाजातील मोठे गट आमने-सामने आले. वाद आणखी वाढल्याने दोन्ही बाजूने तुफान दगडफेक आणि संतप्त जमावाकडून एक ऑटो रिक्षा व दोन दुचाकीची जाळपोळ करण्यात आली होती. पोलिसांकडून जमावाला पांगवण्यात आले. त्यामुळे परिस्थिती नियंत्रणात आली होती. त्यानंतर आज पुन्हा वाद झाल्याने तणाव निर्माण झाला होता. आता परिसरामध्ये कडक बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे.

किरकोळ वादाचा प्रसंग

हरिहर पेठ भागात आज सायंकाळी किरकोळ वादाचा प्रसंग घडला होता. वेळीच दखल घेऊन तो मिटवण्यात आला. परिसरात चोख बंदोबस्त तैनात असून शहरात शांतता आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेऊ नये, असे आवाहन जुने शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार नितीन लेव्हारकर यांनी केले आहे.

आरोपींची धरपकड

जुने शहरातील हरिहर पेठ भागात सोमवारी झालेल्या दोन गटातील वाद व त्यानंतर दगडफेक, जाळपोळ प्रकरणी जुने शहर पोलिसांनी आरोपींची धरपकड सुरू केली आहे. या प्रकरणात जुने पोलीस ठाण्यात चार गुन्हे दाखल करण्यात आले. त्या गुन्ह्यांखाली १७ आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणी कसून चौकशी करण्यात येत असून पुढील तपास जुने शहर पोलीस करीत आहेत.

दीक्षाभूमी जाणाऱ्या अनुयायांसाठी आरोग्य तपासणी व भोजनदान, प्रज्ञास्पर्श बहु. संस्थेचे आयोजन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१० नांदगाव पेठ- दीक्षाभूमीवर अभिवादनासाठी जाणाऱ्या अनुयायांसाठी प्रज्ञा स्पर्श बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने दि.११ व १२ ऑक्टोबर रोजी आरोग्य तपासणी तसेच भोजनदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.नांदगाव पेठ टोल नाका येथे संस्थेच्या वतीने दरवर्षी या कार्यक्रमाचे आयोजन आयोजन करण्यात येते.हजारो अनुयायी याठिकाणी भोजनदान आणि चहापान साठी थांबा घेतात. दरवर्षी असंख्य अनुयायी नागपूर दीक्षाभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी जातात.त्यांना महामार्गावर चहा,पाणी, जेवण व आरोग्य सुविधा मिळायला हव्या यासाठी प्रज्ञास्पर्श बहुउद्देशीय संस्था सातत्याने प्रयत्नशील असते.दरवर्षी पहिल्या दिवशी चहा पाणी आणि दुसऱ्या दिवशी भोजनदान अशी व्यवस्था संस्थेच्या वतीने करण्यात येते. त्या अनुषंगाने ११ ऑक्टोबर ला चहा पाणी व १२ ऑक्टोबर ला भोजनदान तसेच आरोग्य शिबीर असे आयोजन करण्यात आले आहे.अनुयायांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रज्ञा स्पर्श बहुउउद्देशीय संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

इलेक्ट्रिक बस चार्जिंगसाठी ओलेट्रा कंपनी करणार १४ 'बे'ची उभारणी

दिवाळीपर्यंत इलेक्ट्रिक बस सुरू करण्याचे उद्दिष्ट, काम सुरू

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१० अमरावती- एसटी अमरावती विभागात इलेक्ट्रीक बस चालवण्यासाठी येत्या १५ दिवसांत हैदराबाद येथील ओलेट्रो कंपनी तपोवन येथील एसटीच्या वर्कशॉपमध्ये असलेल्या जागेवर १४ 'बे'ची अर्थात चार्जिंगसाठी असलेल्या रांगांची उभारणी करणार आहे. त्यानंतर दिवाळीपर्यंत इलेक्ट्रीक बस सुरू करण्याचे विभागीय नियंत्रक कार्यालयाचे उद्दिष्ट आहे. पावसामुळे या चार्जिंगसाठी असलेल्या रांगा उभारण्याचे काम उशिरा सुरू झाले. ते येत्या १५ दिवसांत पूर्णत्वास जाईल. त्यानंतर शहरात इलेक्ट्रीक एसटी बस दाखल होतील. पहिल्या टप्प्यात २० इलेक्ट्रीक बस मिळणार आहेत. अमरावती विभाग नियंत्रक कार्यालयाने १०० इलेक्ट्रीक एसटी बसची मागणी महामंडळाकडे केली आहे. परंतु, मागील काही दिवसांपासून इलेक्ट्रीक बसच्या उत्पादनाचा वेग कमी झाला आहे. त्यामुळे पहिल्या टप्यात २० बस येण्याची जास्त शक्यता आहे. एसटी बसच्या चार्जिंगसाठी तपोवन येथील एसटीच्या विभागीय कार्यशाळेत ११ केव्हीची विद्युत वाहिनीही जोडण्यात आली आहे. त्यामुळे येथे एकाचवेळी १४ इलेक्ट्रीक बस चार्ज करता येतील. यासोबतच विभागातील इतर सात डेपोंवरही चार्जिंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

दिवाळीआधी इलेक्ट्रिक बस सुरू करण्याचा प्रयत्न

दिवाळीआधी इलेक्ट्रीक बस अमरावती विभागात सुरू करण्याचा आमचा प्रयत्न आहे. यासाठी चार्जिंग स्टेशनचे काम सुरू झाले असून, ते येत्या १५ दिवसांत पूर्ण होईल. दरम्यान आमचा इलेक्ट्रीक बससाठी महामंडळाकडे पाठपुरावा सुरू आहे.

-नीलेश बेलसरे, विभागीय नियंत्रक

शस्त्र घेऊन फिरणारे तीन जण जेरबंद दोन तलवारींसह एक चाकू केला जप्त

गुन्हे शाखेच्या युनिट एकची कारवाई,

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१० अमरावती- शस्त्र बाळगून दुचाकीने फिरणाऱ्या तिघांना गुन्हे शाखेच्या युनिट एकने मंगळवारी, ८ ऑक्टोबर रोजी अटक केली. ही कारवाई नागपुरी गेट ठाण्याच्या हद्दीतील कडबी बाजार पोलिस चौकीजवळ करण्यात आली. आरोपींकडून दोन तलवारी, चायना चाकू व दुचाकी असा १ लाख ४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरेष खान आरिफ खान (१९) रा. हैदरपुरा, मुजाहीद खान मतीन खान (१८) व शेख रेहान शेख नौशाद (१८) दोघेही रा. रहेमतनगर अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. हे तिघे शस्त्र बाळगून दुचाकीने फिरत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट एकला मिळाली.

त्या आधारावर या तिघांना कडबी बाजार पोलिस चौकीजवळ पकडून त्यांची अंगझडती घेण्यात आली. त्यावेळीमुजाहीद खान याच्याजवळ एक पांढरे पोते आढळून आले. त्यात दोन तलवारी आढळून आल्या. तर, अन्य एकाच्या कमरेत चाकू खोचलेला आढळून आला. त्यानंतर आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील कारवाईसाठी नागपुरी गेट पोलिसांच्या सुपूर्द करण्यात आला. या प्रकरणी आरोपींविरुद्ध शस्त्र अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या नेतृत्वात साहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, उपनिरीक्षक प्रकाश झोपाटे, सतीश देशमुख, फिरोज खान, अलीमउद्दीन खतीब, नाझीमउद्दीन सय्यद, विकास गुडदे, सूरज चव्हाण, निखिल गेडाम, अमोल मनोहर, रोशन माहुरे, किशोर खेंगरे यांनी केली.

आपसी वादातून शहरात ३६ तासात झाल्या चार हत्या

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१०अमरावती

आपसी वादातून शहरात ३६ तासात एका महिलेसह चार हत्या झाल्याची नोंद पोलीस दप्तरी आहे. तर एका युवकाचा अकोला टि पॉईंटलगत मृतदेह आढळला असून अद्यापही त्याची ओळख पटलेली नाही. या घटना गंगवारमधून झाल्याची चर्चा शहरात होत असताना यासर्व घटना आपसी वादातून झालेल्या असून गँगवारशी या घटनांचा संबंध नाही. नागरिकांनी घाबरुन जाण्याचे कारण नाही, पोलीस यंत्रणा सतर्क आहे, असे पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी सांगितले.

शहरात सोमवारी दुपारी दत्तुवाडी येथील मोंटू गोलेचा खुन झाला. त्यानंतर रात्री वैभव पटेरिया आणि त्याच दिवशी अजय वानखडेचे हिंदू स्मशानभूमी येथून अपहरण करून त्याचा खून करण्यात आला आणि मंगळवारी सायंकाळी त्रिकोणी प्रेम प्रकरणातून एका महिलेचा खुन करण्यात आला. याशिवाय अकोला टी पॉईटलगत एका युवकाचा मृतदेह आढळला. खुनाच्या चारही घटना आपसी वादातून झाल्या असून कुठल्याही गँगशी त्याचा संबंध नाही. मोंटूचा खून परिसरातील अल्पवयीन मुलांनी केला. त्यामुळे मोंटूच्या मित्रांनी अजय वानखडे याचा खून केला. वैभव पटेरिया याचे आधी शुभम मोहोडसोबत भांडण झाले होते. त्यामुळे शुभम व त्याच्या मित्रांनी त्याचा खून केला. तसेच त्रिकोणी प्रेमप्रकरणातून शुभांगीचा खुन करण्यात आला. यासर्व घटनेमध्ये शहरातील कुठल्याच गँगचे नाव समोर आले नाही. परंतु घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस सर्व बाजूने तपास करीत आहेत. नागरिकांनी भयभीत होऊ नये, पोलीस यंत्रणा २४ तास सतर्क आहे. गुंड प्रवृत्तीचे युवक सार्वजनिक ठिकाणी गुंडागर्दी करीत असेल तर पोलीस अशा गुंडावर कायदेशीर कठोर कारवाई करणार आहे. शहरात शस्त्र घेऊन फिरणाऱ्यावर यापुढे पोलीस कठोर कारवाई करणार असून शहरातील काही ठिकाणी नाकाबंदी करून येणाऱ्या जाणाऱ्यांची तपासणी करून शस्त्र बाळगणाऱ्याची धरपकड करणार असल्याची माहिती पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी दिली. यावेळी पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, गणेश शिंदे, सागर पाटील उपस्थीत होते.आसाराम चोरमले यांच्याकडे अनैतीक मानवी वाहतुक सेलचा पदभार दिला आहे. तसेच त्यांचा अनुभव पाहता त्यांच्याकडे गाडगेनगर व नागपुरीगेट या दोन ठाण्याअंतर्गत वाढलेल्या गुन्हेगारांवर अंकुश लावण्याकरिता विशेष पदभार सोपविण्यात आला आहे. तसेच शहरातील अन्य गुन्हेगारीवर सुध्दा चोरमले यांचा वचक राहिल, असे पोलीस आयुक्त रेड्डी यांनी यावेळी सांगितले.

भारताचा अनमोल ' रतन ' हरवला - प्रविण पोटे पाटील

विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती

प्रसिद्ध उद्योगपती आणि टाटा समूहाचे प्रमुख आदरणीय रतनजी टाटा यांच्या निधनाची वार्ता फक्त भारतालाच नाही तर संपूर्ण जगाला सुन्न करणारी आहे. अफाट हृदयाचं व्यक्तिमत्त्व



आज आपल्यात नाही, याचं फार दुःख आहे खऱ्या अर्थाने भारताचा अनमोल ' रतन ' हरवला आहे. टाटा कुटुंबीयांनी आणि विशेषतः रतन टाटा यांनी या देशासाठी काय योगदान दिलंय, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. कायम समाजाचा विचार, माणुसकी, आणि विनम्रतेचे ते मूर्तिमंत होते. शिक्षण, ग्रामोन्नती आणि कुपोषण आरोग्याच्या क्षेत्रात त्यांनी केलेले काम अतिशय उल्लेखनीय आहे, देशाच्या आर्थिक विकासासोबतच मानवतेच्या विकासात त्यांनी लावलेला हातभार कायम स्मरणात राहील असे मत रतनजी टाटा यांच्या श्रद्धांजली कार्यक्रमात प्रविण पोटे पाटील यांनी मत व्यक्त केले.

पिंगळादेवीच्या गडावर आज 'अंबादेवीची खापरी' विदर्भातील भक्तांची अलोट गर्दी उसळणा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१०नेरपिंगलाई

मातीच्या मडक्याला शुद्धकरून अग्निदेवताला साक्षी ठेवून पिंगळादेवी सामग्रीचे हवन आणि होमहवनाने लाल तप्त झालेले मडके म्हणजे 'खापरी', ती खांद्यावर घेत देवीला प्रदक्षिणा घालण्याचा हा सोहळा बघण्याची विदर्भवासीयांना उत्सुकता लागली आहे. अंगावर शहारे आणणारा, भक्तांना आश्चर्यचकित करणारा असा हा सोहळा आहे. लालबुंद खापरी ब्राह्मण पुजारी तळहातावर, डोक्यावर घेऊन सुसाट वेगाने देवीला प्रदक्षिणा लावतो. तरीही त्याच्या तळहाताला, डोक्याला कुठलीच दुखापत होत नाही. ही 'खापरी' १० ऑक्टोबर रोजी सप्तमीसह अष्टमीला रात्री १२ वाजता उचलली जाणार आहे. अंबादेवीच्या खापरीला दोनशे वर्षांची परंपरा आहे. ७२ वर्षीय पुजारी नारायणराव मारुडकर हे कुटुंबासह नवरात्र महोत्सवात पिंगळादेवीची पूजाअर्चा, श्रृंगारासाठी व आराधनेसाठी दाखल झाले आहेत. वयाच्या चौदाव्या वर्षीपासून ते खापरी उचलत आहेत; परंतु आता त्यांचे पुत्र महेश मारुडकर यांना खापरी उचलण्याचा मान मिळाला आहे. खापरीच्या आत कापराचा दीप अग्निदेवतेला साक्षी मानून प्रज्वलित केला जातो. सप्तशक्तीचा पाठ होतो, सोळा प्रकारच्या सामग्रीचे हवन सोबतच तुपाची आहुती दिली जाते.हा अनोखा सोहळा पाहण्यासाठी भक्त प्रचंड गर्दी करतात.

कास्ट्राइब कर्मचारी महासंघाचे वार्षिक अधिवेशन उद्या नागपुरात

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१०अमरावती

कास्ट्राइब कर्मचारी महासंघाचे ४४ वे वार्षिक अधिवेशन शुक्रवार, ११ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटर, कामठी रोड, नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे.

त्यामध्ये खासगीकरण, मागासवर्गीयांचा अनुशेष भरणे व पदोन्नतीमध्ये अनुशेष भरून काढणे व इतर महत्त्वांच्या प्रश्नांवर चर्चा होणार आहे. हे अधिवेशन कास्ट्राइब कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष कृष्णा इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. उद्घाटक म्हणून केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले तर प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री नितीन राऊत, प्रधान सचिव दिनेश वाघमारे, उपसंचालक विष्णू शिंदे, ॲड. मारपकवार आदी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. संघटनेच्या सर्व पदाधिकारी व सभासदांनी अधिवेशनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महासंघाचे राज्य उपाध्यक्ष एल. जे. वानखडे, शिक्षक संघटनेचे राज्य उपाध्यक्ष, पी. बी. इंगळे, कास्ट्राइब कर्मचारी महासंघ जिल्हा अध्यक्ष प्रकाश मोहोड, शिक्षक संघटनेचे अध्यक्ष राजेश गाडे, वनविभाग संघटनेचे अध्यक्ष आशिष चक्रवती, भूमी अभिलेख संघटनेचे दीपक मोहोड, नितीन इंगोले, दिलीप वानखडे, बांधकाम संघटनेचे निरंजन गावंडे, संजय गायकवाड, महिला बाल कल्याण संघटनेच्या प्रज्ञा भिमटे, विश्वास सावळे यांनी केले आहे.

नवयुवक विद्यार्थी संघटनेचा अनोखा उपक्रम

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१० अमरावती

अमरावती शहरात सध्या नवरात्र उत्सवाची धूम सुरु आहे. आई अंबादेवी व एकविरा देवी चे दर्शन घेण्याकरिता शहरात दररोज हजारो भाविक दाखल होत आहे मात्र या भाविकांची फराळही व्यवस्था नाममात्र दरात नवयुवक विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून करण्यात आली आहे. विद्यार्थी संघटनेने राबविलेला या उपक्रमाचे शहरात अनेक जण जण कौतुक करीत आहे.

अमरावती शहरातील नावलौकिक असलेली नवयुवक विद्यार्थी संघटना वर्षभर नवनवीन उपक्रम राबवित असते. गेल्या काही वर्षांपासून हि संघटना नवरात्र उत्सवाच्या काळात अंबामातेच्या दर्शनाकरिता अमरावती शहरात येणाऱ्या भाविकांची साबुदाणा खिचडी,आणि पुरीभाजी केवळ १५रु,दरात उपलब्ध करून दिली आहे. आजच्या महागाईच्या काळात १५ रु फराळाच्या वस्तू मिळणे शक्यच नाही मात्र गाव खेड्यातून येणाऱ्या भाविक महिला ,पुरूष ,जेष्ठ नागरिक यांच्यासाठी साबुदाणा खिचडी ,आणि पुरी भाजी ची व्यवस्था राजकमल चौकात उपलब्ध करून देण्यात आली आहे सकाळी आठ ते रात्री ९ पर्यंत या ठिकाणी भक्तांना नाममात्र दरात हि व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. सोबत मोफत थंडगार पाण्याची सुविधा हि संघटनेच्या माध्यमातून करण्यात आली आहे. भाविक भक्त याचा लाभ घेत असून अनेकांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे

श्री एकवीरा देवीला दररोज दोन हजार पानांचा तांबूलप्रसाद म्हणून भाविकांना दिवसभर वितरण, विविध आयुर्वेदिक घटकांचा समावेश

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१०अमरावती

विदर्भाची कुलस्वामिनी असलेल्या अमरावतीच्या श्री अंबादेवी, श्री एकवीरादेवी मंदिरात गुरुवारपासून शारदीय नवरात्री उत्सवाला सुरुवात झाली आहे. विदर्भातील प्राचीन शहर असलेल्या अमरावती शहराची पौराणिकदृष्ट्या ओळख आहे. श्रीकृष्ण काळापासून हे मंदिर अस्तित्वात असून, आजही अमरावती शहरातील तिचे स्थान जागृत समजले जाते. श्री एकवीरा देवी मंदिरात रोज पहाटेपासून हजारो भाविक दर्शनाला येतात. मंदिर पहाटेपासून भक्तांकरिता खुले केले जाते. पहाटे देवीचा श्रृंगार करून प्रसाद दाखविला जातो. दररोज दुपारी साडेअकरा वाजता नैवेद्य व आरती करून देवीला तांबूल अर्पण करण्यात येते. विड्याच्या पानाला चुना लावून, काथ, सुपारी, वेलदोडा आदी घालून केलेला विडा म्हणजे तांबूल होय.

श्री एकविरा देवी मंदिरात शारदीय नवरात्रोत्सवाच्या दरम्यान दररोज दोन हजार पानाचा तांबूल अर्पण करण्यातयेतो. त्याचा प्रसाद म्हणून भाविकांना तो दिवसभर दिला जातो.

शरीरासाठी आवश्यक असणाऱ्या विविध आयुर्वेदिक घटकांपासून बनविलेल्या विड्यामध्ये नवरंगा पान, काथ, चुना, बडीशेप, ज्येष्ठमध, गुंजपत्ती, सोप, भरडा सुपारी, जायफळ, लेंडी पिंपळी, सुंठ, काजू, थंडाई बदाम, केशर, पिस्ता, किसमीस, आवळा, खोबरे, लवंग, दालचिनी, 'अस्मनतारा, खडीसाखर, खारिक, वेलदोडा, गुलाबपाकळी आदी पदार्थांचे बहुगुणी फायदे सांगितले जातात. अंबादेवीच्यादर्शनाला येणारे भाविक त्याचे सेवन भक्तिभावाने करतात हे विशेष.

> नवरात्रोत्सवात रोज हजारो भाविक देवीच्या दर्शनाला येतात. दर्शनाला येणारे भाविक देवीचा प्रसाद म्हणून तांबूल मागतात. तसेही बाराही महिने देवीला तांबूल नैवेद्य म्हणून अर्पण करतोच. या काळात भाविकांची संख्या पाहून जास्त प्रमाणात करावे लागते.
>
> **–चंद्रशेखर कुलकर्णी, सचिव, श्री एकवीरा देवी संस्था**

तिवसा तालुक्यातील सर्व पांधन रस्त्याची कामे तात्काळ सुरु करण्याबाबत निवेदन सादर १४ ऑक्टोबर ला पोलीस स्टेशन समोर मनसे व शेतकऱ्याचे एक दिवशीय धरणे आंदोलन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१०तिवसा

तिवसा तालुक्यातील सर्व पांधन रस्त्याची कामे तात्काळ सुरु करण्याबाबत आज रोजी तिवसा तहसीलदार,गट विकास अधिकारी तथापोलीस स्टेशन निवेदन सादर करण्यात आले असून येत्या दि १४ ऑक्टोंबर २०२४ रोजी एक दिवशीय धरणे आंदोलन मनसे व शेतकरी पोलीस स्टेशन समोर करणार आहेत.तिवसा तालुक्यातील पांधन रस्ते अत्यंत खराब असून रस्त्याच्या दोन्ही बाजूस झाडे,झुडपे वाढलेली आहेत,पावसाळ्यात अनेक ठिकाणी चिखल होतो,रस्त्याने पाणी साचले राहते.त्यामुळे शेतकऱ्यांना खूप त्रास सहन करून आपल्या शेतीची कामे करावी लागतात.सदर शेतकरी पांधन रस्त्याची कामे कधी मार्गी लागणार या प्रतिक्षेत

आहे.शेतीचा हंगाम सुरु असून बऱ्याच ठिकाणी शेतकऱ्यांना वहीवाट करणे,शेतीची मशागत करणे त्रासदायक झालेले आहे.आज घडीला सर्व शेतकऱ्यांना आपले शेतीची मशागत करण्यापासून ते उत्पन्न घरी आणण्यापर्यंत खूप अडचणीना सामना करावा लागतो.प्रामुख्याने शेतात जाणारे सर्व पांधन रस्ते अरुंद आहेत.त्यामुळे अनेक ठिकाणी आर्थिक बाबीचा तुटवडा होतो.मुळात ती शिव पांधन आहे परुंतु काही लोकांनी त्या रस्त्यावर अतिक्रमण केले असल्याने बैलबंडी सुद्धा पांधन रस्त्याने ये जा करता येत नाही.त्यामुळे शासनाने यंत्रणा वापरून पांधन मोकळे करून रस्त्याचे खडीकरन करून द्यावे व तिवसा तालुक्यातील पांधन रस्त्याचे प्रश्न मार्गी लावावा असे मनसे संघटना व शेतकऱ्यांनी निवेदन सादर केले.अनेक वेळा निवेदन दिले असता अद्याप पर्यंत कुठल्याही प्रकारे अंबलबजावणी झाली नसल्याने दि.१४ ऑक्टोंबर २०२४ रोजी तिवसा पोलीस स्टेशन समोरील खुल्या जागेत एक दिवशीय धरणे आंदोलन मनसे व शेतकरी करणार आहेत.

दगडफेक प्रकरणातील आरोपी अटक संख्या ३३ वर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१०अमरावती

नागपुरी गेट पोलीस ठाण्यावर शुक्रवार, ४ ऑक्टोबर रोजी रात्री दगडफेक करून वाहनांची तोडफोड करण्यात आली होती. या प्रकरणात आतापर्यंत ३३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणातील अन्य आरोपींचा कसून शोध सुरू आहे.

शुक्रवारी दगडफेक व तोडफोडीची घडल्यानंतर पोलिसांनी एकाला अटक केली होती. त्यानंतर समाजमाध्यमांवर व्हायरल झालेले व्हिडीओ व ठाण्याच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून पोलिसांनी आरोपींची ओळख पटवून त्यांची धरपकड सुरू केली. त्यानुसार, शनिवार ५ ऑक्टोबर व रविवार, ६ ऑक्टोबर या दोन दिवसांत पोलिसांनी २२ आरोपींना अटक केली. त्यानंतर या प्रकरणात आणखी १० आरोपींना अटक करण्यात आली. त्यामुळे जा प्रकरणात आतापर्यंत अटक करण्यात आलेल्या आरोपींची अटक संख्या ३३ वर पोहोचली आहे. अन्य आरोपींचा कसून शोध सुरू आहे. विशेष म्हणजे, या घटनेसंदर्भातील वादग्रस्त वक्तव्याचा व्हिडीओ व्हायरल करणाऱ्यांची ओळख पटविण्यात आली असून त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे. सोबतच या घटनेच्या गुन्ह्यात आयटी ॲक्ट अन्वये कलम वाढ करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी दिली.

संकटग्रस्त शेतकऱ्यांना मिळालेल्या मदतीचेही श्रेय लाटण्याचा प्रयत्न : शेतकऱ्यांमधून उमटल्या संतप्त प्रतिक्रिया

हरताळा येथील दुर्घटनेत झाला होता ८ गाईंचा मृत्यू

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१० भातकुली

भातकुली तालुक्यातील हरताळा येथे एका शेतात जिवंत विद्युत तार अंगावर पडल्याने आठ गाईंचा घटनास्थळीच मृत्यू झाला होता. अचानक ओढवलेल्या या संकटामुळे संकटग्रस्त शेतकऱ्यांचे सांत्वन करण्याऐवजी त्यांना प्रशासनाने जाहीर केलेल्या सानुग्रहाच्या मदतीतून आपली राजकीय पोळी शेकण्याच्या प्रयत्नात काही लोकांनी श्रेय लाटण्याचा प्रकार चालविला आहे. या प्रकारामुळे संकटग्रस्त पशुपालक शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.विद्युत पुरवठा करणाऱ्या मुख्य लाईनची जिवंत विद्युत तार अंगावर पडून शेतात चरणाऱ्या आठ गाईंचा घटनास्थळीच तडफडून मृत्यू झाल्याची घटना भातकुली तालुक्यातील हरताळा या गावी गुरुवारी सकाळी घडली होती. घटनेचे गांभीर्य ओळखून शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी घटनास्थळी

सकाळीच धाव घेऊन महावितरणचे अधिकारी, पशुपालन विभागाचे अधिकारी, तहसीलदार ,तलाठी ,पोलीस या सर्व अधिकाऱ्यांना अवघ्या काही वेळात घटनास्थळी दाखल होन्यास भाग पाडून त्यांच्या मार्फत तात्काळ पंचनामे करून घेतले . खराटे यांनी यावेळी आक्रमक भूमिका घेऊन दोषी असणाऱ्यांवर कठोर कारवाई करून पशुपालक शेतकऱ्यांना तत्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी केली होती. एवढेच नाही तर अधिकाऱ्यांच्या उपस्थितितीचच दगावलेल्या जनावरांचे दफन करण्यात आले होते. या गंभीर प्रकारणाची तत्काळ दखल घेऊन जिल्हा प्रशासनाने संकटग्रस्त पशुपालक शेतकऱ्यांना मदतही मिळवून दिली आहे. सुनिल खराटे यांच्या अथक प्रयत्नाने पशुपालक शेतकऱ्यांना ही अर्थिक मदत तत्काळ मिळाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करून त्यांचे आभारसुद्धा मानले होते. असे असतांना काही स्वयंघोषित समाजसुधारकांनी या घटनेचे श्रेय घेण्याचा प्रयत्न चालविला असून आमच्याच पाठपुराव्यामुळेच शेतकऱ्यांना ही मदत मिळाल्याचा डांगोरा पिटत असल्याने शेतकाऱ्यांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

'जनसामान्यांच्या हक्काचा बुलंद आवाज देवेंद्र फडणवीस' यांच्या कार्य अहवालाचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रकाशन

नागपूरसह दक्षिण-पश्चिम मतदार संघाच्या विकासाला चालना आयकॉनिक संस्था,मेडिकल हब,मेट्रो सिटी म्हणून नवी ओळख

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१० नागपूर

देवेंद्र फडणवीस हे कर्तबगार व धडाडीचे लोकप्रतीनिधी आहेत. त्यांनी राज्याच्या विकासासाठी तसेच नागपुरच्या सर्वांगिण विकासासाठी बहुमोल योगदान दिले आहे. महत्वाचे प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावेत तसेच जनतेला जागतिक दर्जाच्या उत्तम सेवा मिळाव्यात यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात असे प्रतिपादन केंद्रीय परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज येथे केले.महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दक्षिण-पश्चिम नागपूर विधानसभा मतदार संघातील विकास कामांवर आधारित कार्यअहवाल पुस्तिकेचे प्रकाशन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले.यावेळी आमदार प्रवीण दटके, डॉ. परिणय फुके, महापालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, आदीवासी विकास विभागाचे अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, तसेच माजी सत्तापक्ष नेता अविनाश ठाकरे, प्रकाश भोयर, माजी महापौर नंदाताई जिचकार, किशोर वानखेडे, प्रा.राजू हडप, रितेश गावंडे आदी उपस्थित होते.दक्षिण-पश्चिम विधानसभा क्षेत्राचे आमदार, राज्याचे मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेता तसेच उपमुख्यमंत्री म्हणून त्यांची जनतेप्रती असेलेली कटिबध्दता यामुळेच नागपूर शहरासह राज्यातील जनतेमध्ये एक आश्वासक नाते निर्माण केले आहे. त्यामुळेच त्यांना लोकांचा भरपूर पाठिंबा मिळत आला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी कोरोना काळात केलेले कार्य कधीही महाराष्ट्र विसरणार नाही. त्यांनी या काळात मदत कार्यावर जातीने लक्ष ठेवले. स्वत:वर संकट ओढवले तरी त्यांची पर्वा न करता पालकांचे क्षेत्र हरवलेल्यांना दत्तक घेतले, त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. पण याचा कुठेही गाजावाजा केला नाही.उपराजधानीला नवी दिशा देण्याचे काम अव्याहतपणे सुरु आहे. मेट्रो, मिहान, आयआयएम सारख्या आयकॉनिक संस्था यासोबतच विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न सर्वश्रृत आहे. समृध्दी महामार्गात अनेक राजकीय अडथळे आले ते दूर करण्याची किमया त्यांनी साधली. त्याचमुळे नागपूर थेट मुंबईशी जोडले गेले. आणि राज्याला समृध्द करण्याचा मार्ग सुकर झाला. दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदार संघ, नागपुरचा विकास गडचिरोली सारख्या अतिदूर्गम आदीवासी जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी पालक म्हणून जबाबदारी स्वीकारली. रोजगाराच्या प्रश्नासोबत शेतकरी देखील समृध्द व्हावा तसेच समाजातील सर्वच घटकांना विकासाची संधी उपलब्ध व्हावी यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचा आढावा या कार्यअहवाल पुस्तिकेत सादर करण्यात आला आहे.

यांना कोण समजावून सांगणार... उपोषणाची अशी त्रहा

सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती येथे एक उपोषणकर्ता अर्ध नग्न अवस्थेत थेट शिवाजी महाराजांच्या फोटोला पाय लावून अशी झोप घेत आहे. विशेष म्हणजे सकाळी याच रोडवर अनेक महिला,जेष्ठ नागरिक,पुरुष हे मंडळी फिरायला जातात तेंव्हा हा उपोषणकर्ता निद्रा अवस्थेतच असतो .

निवडणुकांपूर्वी कुणबी प्रमाणपत्र देण्याचा मार्ग मोकळा; याचिकेवर सुनावणी तहकूब

विदर्भ प्रजासत्ताक दि.१०मुंबई

राज्यातील मराठा आरक्षणाचा प्रश्न अद्यापही कायम असून मराठा समाजाला ओबीसीतून (जइउ) आरक्षणाची मागणी पूर्ण न झाल्याने उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील अधिक आक्रमक झाले आहेत. एकीकडे राज्यातील १५ जातींचा ओबीसीमध्ये समावेश करण्याची शिफारस राज्य सरकारने केंद्र सरकारकडे केली आहे. मात्र, मराठा समाजाच्या मागणीकडे सरकारने दुर्लक्ष केल्याचे सांगत जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा राज्य सरकार व ओबीसी नेत्यांवर तोफ डागली. तर, मराठा समाजाला राज्य सरकारने स्वतंत्रपणे १० टक्के आरक्षण दिलं असून ते आरक्षण कोर्टात टिकेल, असा विश्वास राज्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे. दुसरीकडे मनोज जरांगे यांच्या उपोषणानंतर राज्य सरकारने मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यास सुरूवात केली होती. त्यावर, आक्षेप घेत न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यावरील, सुनावणी आता ४ आठवड्यांसाठी पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे, विधानसभा निवडणुकांपूर्वी कुणबी प्रमाणपत्र देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

हिंदू संघटनांना आव्हान देणाऱ्याला शिकवला धड़ा

जाहीर माफी मागितल्या नंतर प्रकरण शांत : आव्हानाला चोख प्रत्युत्तर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१० अमरावती

विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि सर्व हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने दरवर्षी नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित गरब्याबाबत सर्व गरबा मंडळांना विनंती करण्यात येते. बिगर हिंदूंना गरबा पंडालमध्ये येऊ देऊ नये, असेही म्हटले आहे. त्यांनी असे कोणतेही काम करू नये की ज्यामुळे हिंदूंच्या श्रद्धेला ठेच पोहोचेल, परंतु असे असतानाही सायन्स स्कोअर मैदानाच्या गरबा इव्हेंटच्या एका आयोजका पैकी एक असलेल्या त्याच्या भावाने फेसबुकवर पोस्ट टाकून हिंदू संघटनांना आवाहन केले आहे की गरबा इव्हेंट हा फालतू हिंदुत्वाचा कार्यक्रम होऊ नये, शिकवण्याची आणि मार खाण्याचे कोणी शौकीन असेल तर गरबा सेंटरवर या, असे ओपन चॅलेंज दिले होते ते चॅलेंज संघटनांनी स्वीकारत विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि सर्व हिंदुत्व संघटनांनी सायन्स स्कोअर मैदानाच्या गरबा केंद्रावर जात ते आवाहन स्वीकारले. आज आम्ही इथं आलो असं कुणी म्हटलं की कुणी ही पोस्ट केलीय. त्याला फोन करून माफी मागावी अन्यथा हिंदत्व काय असते ते आम्ही दाखवू.असे जाहीर करताच ज्या युवकाने फेसबुक वर जी पोस्ट टाकली होती तो युवक मंचावर आला व त्याने जाहीरपणे माफी मागितली तो युवक जो पर्यंत आला नाही तो पर्यंत सर्व संस्थांनी एकत्रितपणे हनुमान चालीसाचे पठण केले आणि तो येईपर्यंत कार्यक्रम थांबवण्यात आला, त्यानंतरच हा वाद शांत झाला आणि खासगी गरबा सेंटरचे आवाहन करण्यात आले. त्यांनी नियम पाळावेत, आधारकार्ड पाहूनच एंट्री द्यावी, गरबा हा मातृशक्तीच्या पूजेचा विषय आहे, त्याला करमणूक म्हणून घेऊ नका, नाहीतर आम्ही असेच ठोकत राहू.असेही यावेळी जाहीर करण्यात आले.यावेळी विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, मातृशक्ती, दुर्गावाहिनी, हिंदू हुंकार संघटना, राष्ट्रीय श्री राम सेना, तसेच सर्व हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. अमोल कोल्हे यांचे बेलोरा विमानतळावर नितीन कदम यांनी केले भव्य स्वागत

आगामी बडनेरा विधानसभा निवडणुकीसंदर्भात केली विस्तृत चर्चा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१०अमरावती

राज्यामध्ये लवकरच विधानसभा निवडणूका होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्वच पक्षांनी जोरदार तयारी सुरु केली आहे. विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे राजकारण रंगले आहे.राज्यामध्ये सर्वच पक्ष विधानसभा निवडणूकीसाठी उत्सुक आहेत. त्यामुळे प्रचाराचा धुराळा देखील उडाला आहे. आता राज्यामध्ये दसऱ्यानंतर लगेचच विधानसभा निवडणूका होण्याची शक्यता आहे. निवडणुकीची घोषणा ही येत्या १३ ऑक्टोबरनंतर होण्याची शक्यता आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. दरम्यान अश्यातच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार) खासदार संसदरत्न डॉ. अमोल कोल्हे राजकीय कार्यक्रमानिमित्त अमरावती येथील बेलोरा विमानतळ येथे आले असता संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नितीन कदम यांनी डॉ. कोल्हेचें भव्य स्वागत केले. त्याचप्रमाणे अमरावती जिल्ह्यातील आराध्य दैवत असलेल्या आई अंबामातेची प्रतीमा भेट दिली. दरम्यान यावेळी आगामी विधानसभा निवडणुकीबाबत विस्तृत चर्चा केली.कदम यांनी डॉ.कोल्हे यांच्याशी चर्चा करतांना बडनेरा विधानसभा मतदार संघाच्या विकासात्मक धोरणाचा दस्ताऐवज सुपूर्द केला. दरम्यान सदर विस्तृत चर्चेमध्ये आधुनिकीकरण, अभिनवता हा कुठल्याही उद्योगाच्या व्यवसाय धोरणातील महत्त्वाचा घटक असून, त्याला चालना देण्यासाठी उद्योग व शिक्षण क्षेत्रात अधिक समन्वय व सहकार्य व बडनेरा शहर व ग्रामीण भागातील औद्योगिक , शैक्षणिक, रोजगार विषयक, आरोग्य विषयक बाबतीत गेल्या कित्येक वर्षापासून पिछाडीवर आहे याबतीत चर्चा करण्यात आली. त्याचप्रमाणे अनेक वर्षापासून शेतकऱ्यांच्या प्रलंबित असलेल्या मुख्य आणि वैध प्रमुख मांगण्यासंदर्भात कदम यांचेकडून भर देण्यात आला. यावेळी संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नितीन कदम यांच्या सामाजिक सेवाकार्य व वाढता जनसंपर्क बघता शाबासकीची थाप दिली.नितीन कदम यांनी काही दिवसापर्वीच शरदचंद्रजी पवार यांच्या भेटीनंतर आ. रोहित पवार, जयंत पाटील,अनिल देशमुख व आता संसदरत्न डॉ.अमोल कोल्हे यांच्या अंबानगरीतील आगमनार्थ भेटीनंतर अनेकांना आश्चर्याचा सुखद धक्का बसला असून बडनेरा विधानसभा मतदार संघातील राजकीय घडामोडीत मोठा बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

माजी सैनिक असलेल्या शेतकऱ्याने झाडाखाली आश्रय घेतला अन् विजेने गेला जीव

धामणगाव तालुक्यात विजेचा कहर ; हिरापुर शेतशिवारात वीज पडून संतोष शर्मा ठार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१०धामणगाव रेल्वे

तालुक्यात वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसाने बुधवारला (ता.९) सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास दाणादाण उडवली.दरम्यान हिरापुर शेतशिवारात वीज पडून माजी सैनिक असलेल्या शेतकऱ्याचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार असे की,शहरातील माजी सैनिक असलेले शेतकरी संतोष दुलीचंद शर्मा (६७) हे हिरापुर येथील शेतशिवारातील आपल्या शेतात गेले होते.बुधवारला (ता.९) सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास विजेच्या कडकडाटसह जोरदार पावसाला सुरुवात झाली.दरम्यान सायंकाळ झाल्यानंतरही संतोष शर्मा हे घरी परतले नाही.त्यामुळे त्यांच्या

कुटुंबीयांनी त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधला परंतु होऊ शकला नाही त्यानतंर कुटुंबीयांनी शोधाशोध सुरू केली.रात्री त्यांचा मृतदेह त्याच्या शेतात झाडाजवळ आढळून आला. त्यांनी एका झाडाजवळ आश्रय घेतला.दरम्यान अचानकपणे झाडावर वीज कोसळली त्यात संतोष शर्मा यांचा घटनास्थळीच दुर्दैवी मृत्यू झाला.घटनास्थळाचा दत्तापुर पोलिसांनी पंचनामा केला असून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आला होता. पश्चात पत्नी,एक मुलगा,एक मुलगी व बराच मोठा आप्त परिवार आहे.

घटनास्थळाचा पंचनामा महसूल विभागातर्फे तलाठी व मंडळ अधिकारी यांनी केला असून यांचा अहवाल आल्यानंतर शासनाला प्रस्ताव पाठविण्यात येईल.

अभय घोरपडे, तहसिलदार धामणगाव रेल्वे

२५ विधानसभा मतदारसंघात शेतकरीपुत्र निवडणूक लढणार - शेतकरी नेते रविकांत तुपकर

विदर्भ प्रजासत्ताक दि.१०यवतमाळ

शेतकरी प्रश्नांबाबत व्यवस्थेच्या अनास्थेमुळे राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था बिकट आहे. शेतकऱ्यांसाठी लढणारे अनेक कार्यकर्ते राज्यात आहेत. या सर्व कार्यर्त्यांना एकत्र आणून ज्यांच्यामागे जनाधार आहे, अशा तरूणांना विधानसभेत पाठविण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी आपण राज्यात दौरा करत असून किमान २५ विधानसभा मतदारसंघात शेतकऱ्यांची मुलं निवडणूक लढतील, अशी माहिती शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी दिली.

या दौऱ्यानिमित्त रविकांत तुपकर हे यवतमाळ येथे आले असता, त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. राज्यात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आक्रमकपणे रस्त्यावर उतरणारे जे तरुण आहेत आणि ज्यांच्यामागे जनाधार आहे, असे तरुण विधानसभेत गेले पाहिजे. यासाठी आपण राज्याचा दौरा करीत आहोत. या दौऱ्यात अनेक तरूण कार्यकर्ते भेटत आहेत. त्यांना आपण बळ देत आहोत. अनेकजण शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर स्वतंत्र किंवा विविध संघटनांच्या माध्यमातून आंदोलन करून सरकारला जाब विचारत आहेत. अशा तरूणांना संघटित करून त्यांना राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणले पाहिजे, असे रविकांत तुपकर म्हणाले. राज्यातील किमान २५ विधानसभा मतदारसंघात शेतकरी आंदोलक कार्यकर्त्यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरविण्याची तयारी असल्याचे त्यांनी सांगितले.